अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १९३ । रविवार २६ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'

भाग ३८

## आत्मसाक्षात्काराची वेळ: केवळ शास्त्रे नको, आता अनुभूती हवी!

आज आपण इतिहासाच्या अशा वळणावर उभे आहोत, जिथे केवळ देवी शक्तीच्या गप्पा मारून चालणार नाही, तर तिचे अस्तित्व सिद्ध करणे अनिवार्य झाले आहे. आपल्या प्राचीन शास्त्रांनी ज्या सर्वव्यापी शक्तीचे वर्णन केले आहे, तिची अनुभूती घेणारे महात्मे आजवर फार कमी झाले. जे या दिव्य साम्राज्यात पोहोचले, त्यांची अवस्था इतकी उच्च होती की ते सामान्य लोकांशी संवाद साधू शकले नाहीत. त्यांनी रचलेली स्तोत्रे आणि गीते आपण वाचतो, परंतु त्यांनी घेतलेली प्रत्यक्ष अनुभूती सामान्य माणसाला मात्र घेता आली नाही.परिणामी, आज धर्माचे महत्त्व कमी होऊन लोकांचा ईश्वरावरील विश्वास उडू लागला आहे. १९७० मध्ये ही गोष्ट प्रकर्षाने उमजली की, जोपर्यंत मानवाला त्याच्या स्वतःच्या आत स्पंदित होणाऱ्या अस्तित्वाचा अनुभव येत नाही, तोपर्यंत तो सत्य शोधू शकणार नाही. आता ती वेळ आली आहे, जेव्हा आपण सर्वांनी एकत्रितपणे त्या परमेश्वरी साम्राज्यात उतरायला हवे. जेव्हा मनुष्याला आत्मसाक्षात्कार मिळतो आणि त्याच्या बोटांच्या टोकांवर 'चैतन्य लहरी' स्पंदित होऊ लागतात, तेव्हाच त्याची खात्री पटते. ही जागृती केवळ स्वतःपुरती मर्यादित नसून, याद्वारे आपण इतरांनाही बरे करू शकतो आणि त्यांनाही हीच दिव्य अनुभूती देऊ शकतो. हीच खरी आध्यात्मिक क्रांती आहे.

# धीरेंद्र शास्त्री बरळले; महाराष्ट्र खवळला..!

## संतापाची लाट : मुधोजी भोसले यांनी सुनावले खडेबोल

### 'बागेश्वर धाम'ला महाराष्ट्र बंदीची राज्यभरातून मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नागपूर/अहिल्यानगर:** नागपूर येथे आयोजित एका कार्यक्रमात बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या भेटीबाबत केलेल्या वादग्रस्त विधानामुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. शास्त्री यांच्या या विधानाचा नागपूरच्या भोसले राजघराण्याचे वंशज श्रीमंत मुधोजी राजे भोसले यांच्यासह राजकीय नेत्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला असून, महाराजांच्या पुण्याईमुळेच आज तुम्ही बाबा आहात, अशा शब्दांत त्यांना सुनावले आहे. दरम्यान राज्यभर धीरेंद्र शास्त्रींचा निषेध करण्यात आला. त्यांना महाराष्ट्र बंदी घालण्याची मागणी विविध राजकीय पक्ष तसेच सामाजिक संघटना व शिवप्रेमींकडून करण्यात आली.

नागपुरातील भारतदुर्गा शक्ती स्थळाच्या शिलान्यास सोहळ्यात बोलताना धीरेंद्र शास्त्री यांनी असा दावा केला की, छत्रपती शिवाजी महाराज युद्ध करून थकले होते आणि त्यांनी समर्थ रामदास स्वामींकडे जाऊन राजपाट सांभाळण्याची विनंती केली होती. त्यावर समर्थांनी तो मुकूट पुन्हा महाराजांच्या डोक्यावर ठेवून गुरुआज्ञा म्हणून राज्य चालवण्यास सांगितले. शास्त्रींच्या या विधानाने शिवरायांच्या पराक्रमाचा अवमान झाल्याची भावना शिवप्रेमींमध्ये उमटली आहे.

**..अन्यथा तुम्ही मौलवी झाला असता**

**नागपूरचे मुधोजी राजे भोसले यांनी शास्त्रींवर घणाघाती टीका करताना म्हटले की, उत्तर भारतातून सुपारी घेतल्याप्रमाणे महाराष्ट्रात येऊन चुकीची विधाने करू नका. महाराजांनी देव, देश आणि धर्मासाठी आयुष्य वेचले. त्यांच्यामुळेच आज तुम्ही सुरक्षित आहात, अन्यथा आज तुम्ही मौलवी झाला असता.**



इतिहास अभ्यासक आणि तज्ज्ञांच्या मते, शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्यात गुरु-शिष्य नाते असल्याचे कोणतेही ठोस ऐतिहासिक पुरावे उपलब्ध नाहीत. बहुतांश इतिहासकारांनुसार, १६७२ पूर्वी या दोघांची भेट झाल्याचा कोणताही उल्लेख आढळत नाही. त्यामुळे स्वराज्य निर्मितीच्या काळात किंवा बालपणी रामदासांनी मार्गदर्शन केले, हा दावा निराधार ठरतो. चाफळच्या ज्या सनदेचा आधार काही लोक घेतात, त्या सनदेच्या सत्यतेवरही इंद्रजित सावंत आणि ग. भा. मेहेंदळे यांसारख्या संशोधकांनी शंका उपस्थित केल्या आहेत. बाबासाहेब पुरंदरे, सेतुमाधवराव पगडी, वा. सी. बेंद्रे यांसारख्या दिग्गज शिवचरित्रकारांनीही समर्थ रामदास हे महाराजांचे राजकीय गुरु होते, असे कुठेही नमूद केलेले नाही.

दुसरीकडे, आमदार रोहित पवार आणि काँग्रेस नेत्यांनीही या विधानाचा निषेध केला असून, धीरेंद्र शास्त्री यांना महाराष्ट्र बंदी घालण्याची मागणी केली आहे. जिजाऊंनी महाराजांना घडवले, त्याच त्यांच्या आद्य गुरु होत्या, हीच भूमिका जनसामान्यांतून व्यक्त होत आहे.

थोडक्यात सांगायचे तर, छत्रपती शिवरायांच्या इतिहासाचे विकृतीकरण करण्याचे प्रयत्न वारंवार होत असून, शास्त्रींचे हे विधान त्याच शृंखलेचा भाग असल्याचे बोलले जात आहे. या प्रकारामुळे राज्यातील वातावरण तापले असून 'दैनिक राष्ट्र सह्याद्री' या प्रकरणावर बारीक लक्ष ठेवून आहे.

# मराठी शिकवणार; पण जबरदस्ती नाही

## 'ऑटो-टॅक्सी चालकांना मराठी सक्ती'वर देवेंद्र फडणविसांची घोषणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई :** राजकारणात 'मराठी अस्मिता' आणि भाषेचा मुद्दा पुन्हा एकदा तापला आहे. राज्याच्या परिवहन विभागाने टॅक्सी आणि रिक्षा चालकांसाठी मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्याचा एक महत्त्वाचा प्रस्ताव मांडला आहे. मात्र भाषेच्या नावाखाली कोणावरही हिंसाचार किंवा जबरदस्ती केली जाणार नाही, उलट सरकार चालकांना मराठी शिकण्यास मदत करेल. महाराष्ट्र परिवहन विभागाने मोटार वाहन नियमावलीतील नियम ४, ७८ आणि ८५ मध्ये सुधारणा करण्यासाठी गृह विभागाकडे एक प्रस्ताव पाठवला आहे. नवीन प्रस्तावानुसार, सार्वजनिक वाहने आणि मीटर असलेल्या कॅबच्या परवान्यासाठी मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य असेल, असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. **(पान ४ वर)**

### महत्त्वाचे..

**केसीआर यांच्या टीआरएस पक्षात फूट**

हैदराबाद : तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री केसीआर यांची कन्या कविता यांनी आपल्या नवीन पक्षाची घोषणा केली आहे. त्यांच्या पक्षाचे नाव 'तेलंगणा राष्ट्र सेना' ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे त्यांनी बीआरएसच्या पूर्वीच्या नावाशी, टीआरएस (तेलंगणा राष्ट्र समिती) शी मिळतेजुळते नाव स्वीकारले आहे.

हैदराबादच्या बाहेरील एका कार्यक्रमात कविता यांनी आपल्या पक्षाच्या नावाची घोषणा केली. सप्टेंबर २०२५ मध्ये बीआरएसच्या राजवटीत बांधलेल्या कालेश्वरम उपसा सिंचन प्रकल्पावरून आपले वडील आणि बीआरएस अध्यक्ष के. चंद्रशेखर राव यांची प्रतिमा 'डागाळल्याचा' आरोप चुलतभाऊ आणि पक्षाचे नेते टी. हरीश राव आणि नातेवाईक जे. संतोष कुमार यांच्यावर केल्यामुळे कविता यांना बीआरएसमधून निलंबित करण्यात आले होते. तेलंगणा जागृतीच्या माध्यमातून सक्रिय राहिलेल्या कविता यांनी, बीआरएसमधून निलंबन झाल्यापासून सरकार आणि विरोधी पक्ष या दोघांवरही सातत्याने टीका केली आहे.

# नदीजोड प्रकल्पच्या माध्यमातून राज्य दुष्काळमुक्त करणार : मुख्यमंत्री फडणवीस

- गोदा ते नर्मदा जलयात्रेचा दिमाखदार शुभारंभ
- जलसंवर्धनाचा जागर करत अहिल्यादेवींना अनोखी मानवंदना
- मंत्री विखे पाटील यांच्या संकल्पनेचे मुख्यमंत्र्यांनी केले कौतुक

**जलयात्रेचा प्रवास असा राहील**

२५ एप्रिल: त्र्यंबकेश्वर ते संगमनेर (मुक्काम: संगमनेर).
२६ एप्रिल: संगमनेरमार्गे शिर्डी (मुक्काम: शिर्डी).
२७ एप्रिल: कोपरगाव, वैजापूर, संभाजीनगर, घृष्णेश्वर (मुक्काम: घृष्णेश्वर).
२८ एप्रिल: कन्नड, चाळीसगाव, धुळे (मुक्काम: धुळे).
२९ एप्रिल: धुळे ते महेश्वर, मध्य प्रदेश (समारोप).

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे भव्य शुभारंभ झाला. नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्याला दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून येत्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने निर्मळ आणि अविरल गोदावरीसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

अहिल्यादेवींचे विचार, वारसा आणि विकास हा त्रिसूत्री मंत्र घेऊन ही यात्रा सुरू झाली आहे. कार्यक्रमाला भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, इंदूर संस्थानचे श्रीमंत युवराज महाराज यशवंतराव होळकर, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, आ. सीमा आहेर आ. देवायानी फरांदे आ. डॉ राहूल ढिकले आ. गोपीचंद पडळकर आ. सदाभाऊ खोत आ. हिरामण खोसकर आ. दिलीप बनकर, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, विभागीय प्रवीण गेडाम आदी उपस्थित होते.





मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वेदांमध्ये नदीचे महात्म्य वर्णन केले असून नदीला आई मानले आहे. नदी स्तुतीसुक्तात ऋषींमुनींनी नदीच्या उपयुक्ततेचे वर्णन केले आहे. वारशाचे संवर्धन आणि विकास याचा समन्वय देशाच्या उज्वल भवितव्यासाठी आवश्यक आहे. म्हणूनच अहिल्यादेवींच्या विचाराच्या आधारे भविष्यातील विकासाची दिशा दाखविण्यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. गोदावरी नदी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेशासाठी महत्वाची असल्याने ती बारमाही प्रवाहित राहावी यासाठीदेखील प्रयत्न सुरू आहेत, असे त्यांनी सांगितले..

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जलव्यवस्थापनातील योगदानाचे स्मरण केले. ते म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी घाट, बारव यांची निर्मिती करतांना अध्यात्मिकता आणि उपयुक्तता याचा समन्वय साधला. पाण्याचे महत्व लक्षात घेऊन जलव्यवस्थापनावर भर दिला. त्यांनी निर्माण **(पान ४ वर)**



# शिरूरमध्ये रुग्णवाहिकेअभावी रस्त्यावर प्रसूती

## जोशीवाडीतील महिलेच्या मदतीला धावल्या 'सावित्रीच्या लेकी'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**साड्या आणि स्कार्फचा आडोसा करून पार पाडली प्रसूती**

**शिरूर :** शिरूर शहरातील निर्माण प्लाझा परिसरात माणुसकीचे दर्शन घडवणारी एक हृदयस्पर्शी घटना घडली आहे. रुग्णालय गाठण्यापूर्वीच प्रसूती कळा असह्य झालेल्या एका महिलेला भररस्त्यात बाळाला जन्म द्यावा लागला. प्रशासकीय यंत्रणा मदतीला पोहोचण्यापूर्वीच परिसरातील महिलांनी साड्या आणि स्कार्फचा आडोसा तयार करत या मातेला मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले. **(पान ४ वर)**

### प्रशासकीय दिरंगाईवर टीका

**प्रसूती सुखरूप पार पडल्यानंतर काही वेळाने रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचली आणि माता-बाळाला ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. सुदैवाने दोघेही सुरक्षित आहेत. मात्र, जोशीवाडीसारख्या जवळच्या भागातून रुग्णालयात जाताना महिलेवर ही वेळ ओढावणे, हे आरोग्य यंत्रणेचे अपयश असल्याची टीका नागरिक करत आहेत. जर या महिला देवदूतासारख्या धावून आल्या नसत्या, तर मोठा अनर्थ घडला असता, अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली आहे.**

# देव देश धर्माकरता सदैव जागृत रहा

## वादळे येतील, पूर महापुरात सर्व वाहून जाईल मात्र अस्तित्व वाहू देऊ नका

- देवगड येथील गंगापूजन व किर्तन सोहळयात राष्ट्र संत गुरूवर्य श्री भास्करगिरी बाबांचे आवाहन

**सुधीर चव्हाण । राष्ट्र सह्याद्री**





(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील गुरूदेव दत्त पीठ असलेल्या श्री क्षेत्र देवगड येथे राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराजांच्या मातोश्री गुरूमाता श्रीमती सरूआई पाटील यांच्या चौदाव्या निमित्ताने आयोजित गंगापूजन व किर्तन सोहळयाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.देव देश धर्माकरता सदैव जागृत रहा,वादळे येतील,पूर महापुरात सर्व वाहून जाईल मात्र अस्तित्व वाहू देऊ नका असे आवाहन यावेळी झालेल्या किर्तन सोहळयाच्या प्रसंगी राष्ट्र संत गुरूवर्य श्री भास्करगिरी बाबांनी यावेळी बोलतांना केले.

यावेळी झालेल्या चौदाव्या विधीच्या निमित्ताने कलशात आणण्यात आलेल्या देशभरातील अनेक गंगाजलाचे पूजन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबा,त्यांचे बंधू मधुकरबाबा पेसोडे पाटील,भगिनी कमलबाई रायपुरे व पेसोडे पाटील परिवारातील सदस्यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी झालेल्या उदक शांती व गंगापूजन कार्यक्रमाचे पौरोहित्य भेंडे येथील वेदशास्त्रसंपन्न गणेशदेवा कुलकर्णी,शरदगुरू काटकर,हेमंत देवा कुलकर्णी यांच्यासह ब्रम्हवृंद मंडळींनी केले.यावेळी येथील ज्ञानसागर किर्तन मंडपामध्ये हजारो भाविकांच्या उपस्थितीत गिरी आश्रमाचे महंत श्री कैलासगिरीजी महाराज यांचे आईवडील यांचा महिमा सांगणारे किर्तन झाले.

यावेळी झालेल्या किर्तन सोहळयात गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांनी आपले विचार व्यक्त केले ते म्हणाले की राष्ट्राची असलेली संस्कृती व प्रेम जतन करून आपापले काम करत राहण्याचा प्रयत्न झाला पाहिजे हे करतांना राष्ट्र समोर ठेवा,त्यासाठी निद्रेत व स्वप्नातही जागृत रहाण्याचा प्रयत्न करा,देव देश धर्माकरता सदैव जागृत रहा,वादळे येत राहतील,अधूनमधून गारपीट ही होत राहतील,पूर महापूर ही येत राहतील त्यात सर्व वाहून जाईल अस्तित्व वाहून जाऊ देऊ नका असे आवाहन त्यांनी केले.

येणाऱ्या वावटळात कचरा उडत राहील त्याला झटकून द्या,कचरा उडवणारा देखील सुखात रहावा **(पान ४ वर)**

# कॅनरा बँक अधिकाऱ्यांचाच स्ट्रॉंग रूमवर डल्ला!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जालना :** जिल्ह्यातील बदनापूर येथील कॅनरा बँक शाखेत सोन्याच्या दागिन्यांची चोरी आणि बनावट सोने गहाण ठेवून बँकेची ७ कोटी ३१ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. २२ आणि २३ एप्रिल रोजी झालेल्या त्रैमासिक पुनर्मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान हा घोटाळा उघडकीस आला. याप्रकरणी बदनापूर पोलीस ठाण्यात शनिवारी पहाटे १ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तातडीने दोन आरोपींना अटक केली आहे. तपासणी दरम्यान बँकेचे अधिकारी संजय आसाराम डोंगरे (रा. छत्रपती संभाजीनगर) हे स्ट्रॉंग रूममधून सोन्याची पाकिटे गुपचूप खिशात ठेवत असताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले. सखोल चौकशीत असे निष्पन्न झाले की, स्ट्रॉंग रूममधून ३.५२ कोटी रुपयांची ३० सोन्याची पाकिटे गायब आहेत.



## संपादकीय

# निर्दोषत्वाचा 'समृद्धी' महामार्ग

'देश बदल रहा है' ही घोषणा गेल्या दशकभरापासून आपल्या कानावर सतत आदळत आहे. बदल हा निसर्गाचा नियम असला तरी, भारताच्या राजकीय आणि सामाजिक पटलावर सध्या जो बदल घडत आहे, तो केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नाही. रस्ते झाले, उड्डाणपुले बांधली गेली, अर्थव्यवस्थेचे आकडे फुगले आणि डिजिटल क्रांतीचे वारे घराघरांत पोहोचले. हे सर्व डोळे दिपवणारे चित्र रंगवत असतानाच, एका अत्यंत सूक्ष्म आणि तितक्याच भयानक बदलाकडे सर्वसामान्यांचे साफ दुर्लक्ष झाले आहे. हा बदल आहेभ्रष्टाचाराच्या व्याख्येतील बदलाचा आणि 'निर्दोषत्व' बहाल करण्याच्या नव्या राजकीय वॉशिंग मशीनचा!

नुकत्याच झालेल्या राहुरी आणि बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जे काही घडले, ते या बदलत्या देशाचे जिवंत उदाहरण आहे. मतदानाच्या अवघ्या २४ तास आधी प्राजक्त तनपुरे आणि रोहित पवार यांसारख्या नेत्यांना तपास यंत्रणांकडून 'क्लीनचिट' मिळते, हे आता नावीन्य राहिलेले नाही. पण या निर्दोषत्वाचा वेग पाहून आज 'समृद्धी महामार्ग'ही फिका पडू लागला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. तपास यंत्रणांचा 'वेग' आणि राजकारण्यांचे 'सोयीस्कर निर्दोषत्व' हा आता भारतीय लोकशाहीचा नवा केंद्रबिंदू बनला आहे.

काही वर्षांपूर्वी ज्यांच्या नावाने राजकारणाचे रान पेटवले गेले, ज्यांच्या कथित घोटाळ्यांच्या जोरावर सत्तांतरे घडवून आणली गेली, तेच चेहरे आज 'पवित्र' होऊन सत्तेच्या पंगतीला बसले आहेत. बोफोर्स, टूजी स्पेक्ट्रम, कोळसा घोटाळा, राष्ट्रकुल घोटाळाया सर्व प्रकरणांनी एकेकाळी देशाची धूळधाण उडवली होती. दोन-तीन निवडणुका तर याच मुद्द्यांवर लढवल्या गेल्या. पण आज मागे वळून पाहताना प्रश्न पडतो की, या सगळ्याचे झाले काय? कोळसा घोटाळ्यात कनिष्ठ न्यायालयाने दिलेली शिक्षा वरिष्ठ न्यायालयात टिकत नाही. टूजीमधील आरोपी निर्दोष सुटून पुन्हा संसदीय राजकारणात बहराला येतात. ज्यांच्यावर आरोप झाले, ते निर्दोष सुटले; मग गुन्हेगार होते तरी कोण? का हे सर्व केवळ सत्ता हस्तगत करण्यासाठी रचलेले एक मृगजळ होते?

या खेळातून एक नवा 'सत्तेचा महामार्ग' तयार झाला आहे. या महामार्गाला साथ लाभली आहे ती आपल्याकडच्या 'नवनैतिक' मध्यमवर्गाची. हा मध्यमवर्ग अत्यंत सोयीस्कर नीतिमत्ता बाळगतो. सुरुवातीला एखाद्या नेत्याला भ्रष्टाचारी म्हणून हिणवायचे, त्याला बदनाम करण्यासाठी समाजमाध्यमांवर युद्ध पुकारायचे आणि नंतर त्याच नेत्याला आपल्या पक्षात घेऊन त्याला 'स्वच्छ' घोषित करायचे, हाच सत्तेचा नवा मंत्र झाला आहे. गेल्या १२ वर्षांपासून देशात हाच खेळ सातत्याने खेळला जात आहे.

आजची राजकीय परिस्थिती 'आत येणार की आत जाणार?' या प्रश्नाभोवती फिरत आहे. तपास यंत्रणांचा ससेमिरा मागे लागला की, जेलमध्ये जाण्यापेक्षा सत्तेच्या महालक्षात जाणे अनेकांनी पसंत केले. जे खाल्ले ते पचवायचे असेल आणि शांत झोप हवी असेल, तर सत्तेची ऊब गरजेची असते, हे या नेत्यांनी पुरते ओळखले आहे. यामुळे सामान्य जनतेच्या मनातील भ्रष्टाचाराविषयीचा तिटकारा आता बोथट झाला आहे. भ्रष्टाचाराला आपण आता 'शिष्टाचार' म्हणून स्वीकारू लागलो आहोत, ही सर्वात मोठी धोक्याची घंटा आहे.

निवडुंग कितीही काटेरी असला, तरी तो जर सत्तेच्या कुंडीत लावला तर तो गोजिरवाणा वाटू लागतो. ज्यांच्या भ्रष्टाचाराच्या काट्यांना जनता घाबरत होती, तेच काटे आता सत्तेच्या दर्भपात्यांसारखे पवित्र भासू लागले आहेत. या 'पवित्रीकरणाच्या' प्रक्रियेत आता काही मोजकेच चेहरे शिल्लक आहेत. ज्या दिवशी राहुल गांधी, सोनिया गांधी, अरविंद केजरीवाल किंवा शरद पवार हे सुद्धा 'या' बाजूला येतील, त्या दिवशी भारतीय शब्दकोशातून 'भ्रष्टाचार' हा शब्द कायमचा बाद होईल. कदाचित त्या दिवशी साहित्य संमेलनात या शब्दाच्या विसर्जनाचा ठरावही मांडला जाईल आणि तो मांडणाऱ्याला 'पद्मश्री'ने गौरविलेही जाईल.

हे चित्र अतिशयोक्ती वाटत असले, तरी ते वास्तवाच्या खूप जवळ आहे. २०४७ पर्यंत आपल्याला 'विकसित भारत' आणि 'महासत्ता' बनायचे आहे, हे स्वप्न पाहत असताना नीतिमत्तेचा हा जो ऱ्हास होत आहे, तो कोणालाच दिसत नाही का? जेव्हा सर्वच राजकारणी 'वॉशिंग मशीन'मधून स्वच्छ होऊन बाहेर पडतील, तेव्हा समाजात निर्दोषांचे असे काही पेव फुटेल की, त्यात खऱ्या सत्याची ओळख पटवणे कठीण होईल.

अशा वेळी, ज्यांची विचारशक्ती अजूनही शाबूत आहे, अशा सामान्य भारतीयाला एक प्रश्न नक्कीच बेचैन करेल: जर सर्वच निर्दोष आहेत, तर मग हा देश लुटला कुणी? आणि या निर्दोषांच्या अमाप पिकाचे उद्या करायचे काय?

'देश बदल रहा है' म्हणताना आपण कोणत्या दिशेला जात आहोत, याचे आत्मचिंतन करण्याची वेळ आता निघून जात आहे. कारण जेव्हा गुन्हाच उरणार नाही, तेव्हा न्याय मागण्यासाठी कोणाकडे बघायचे, हाच खरा यक्षप्रश्न असेल.

# आ. काळेंच्या नेतृत्वाखाली उत्तर विभागाची गुणवत्तेत भव्य झेप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाचे अध्यक्ष आमदार आशुतोष काळे यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि वेळोवेळी घेतलेल्या धोरणात्मक शैक्षणिक निर्णयातून गुणवत्ता आणि संधी यांचा संगम घडून आला असून राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (छचचड) परीक्षेच्या सन २०२५-२६ च्या निकालात रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाने अभूतपूर्व यश संपादन केले आहे. या परीक्षेत तब्बल ४३९ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून, सर्वसामान्य कुटुंबातील या गुणवंत विद्यार्थ्यांच्या भविष्याला सोनेरी पंख बहाल करून उत्तर विभागाने राज्यभरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आदर्श विचारांवर वाटचाल करतांना स्व.कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी ज्याप्रमाणे रयत शिक्षण संस्थेच्या हिताला प्राधान्य देवून निस्वार्थ भावनेतून रयत शिक्षण संस्थेला खऱ्या अर्थाने प्रगतीच्या शिखरावर नेवून ठेवले. तोच वसा आणि वारसा पुढे चालवितांना उत्तर विभागाची जबाबदारी समर्थपणे पार पाडतांना आमदार आशुतोष काळे यांनी सहा वर्षात उज्वल कामगिरी केली आहे.त्यांनी उत्तर विभागात गुणवत्ता विकास कार्यक्रम राबवून शिक्षणाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणले. विद्यार्थ्यांच्या



क्षमतेचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी त्यांनी नियोजनबद्ध उपक्रमांची अंमलबजावणी केली. त्यामुळे उत्तर विभागाच्या अहिल्यानगर जिल्हा ३१७ विद्यार्थी, नाशिक जिल्हा ११८ विद्यार्थी आणि बीड जिल्ह्यातील ०४ विद्यार्थी अशा एकूण ४३९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला.

यासाठी आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचे स्वतंत्र गुणवर्ग तयार करून स्पर्धा परीक्षांसाठी अतिरिक्त तासांची व्यवस्था करण्यात आली. विषयानुसार सराव परीक्षा आणि नियमित चाचण्या घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येवून पालकांशी सातत्यपूर्ण संवाद साधण्यात आला. या सर्व उपक्रमांमुळे ग्रामीण व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवण्याचा आत्मविश्वास मिळवून देण्यात उत्तर विभाग यशस्वी झाला आहे. त्यामुळे सक्षम नेतृत्व,योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही यशाच्या शिखरावर सहजपणे पोहोचवता येते हे रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. गेल्या पाच वर्षांत उत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी तब्बल १० कोटी ३५ लाख ८४ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली असून त्यामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक आधार मिळून विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाची वाट अधिक सुलभ होण्यास मदत झाली आहे.

# नेवासा खुर्द मुलांच्या शाळेत नवागतांचे स्वागत व चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** जिल्हा परिषदेच्या नेवासा खुर्द मराठी मुलांच्या शाळेत इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या नवागतांचे स्वागत करण्यात येऊन इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.यावेळी विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जि.प. प्राथमिक शाळा नेवासा खुर्द मुले या शाळेत सकाळच्या प्रसन्न वातावरणात नव्यानेच पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या चिमुकल्यांचे ढोलताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. प्रत्येक मुलांच्या डोक्यात राजमुकूट, फुगे, गुलाबाचे फूल व चॉकलेट देऊन मोठ्या थाटामाटात स्वागत करण्यात आले.



यावेळी इयत्ता तिसरीतील विद्यार्थी मुसेब पठाण व हारीस तांबोळी यांनी मनोगत व्यक्त केले. चौथीच्या अनेक विद्यार्थ्यांनी आपली शिक्षकाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शेवटी या शाळेतून जाताना घेतलेले संस्कार व ज्ञानाची शिदोरी आयुष्यभर जपून ठेवू अशी ग्वाही देत उतराई वर्गासाठी गिफ्ट भेट दिले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा प्राजक्ता कडू,उपाध्यक्ष स्वप्नील मगर,केंद्रप्रमुख काशीद सर,नेवासा खुर्द शाळेचे मुख्याध्यापक आसिफ शेख, नेवासा बुद्रुक शाळेचे मुख्याध्यापक पाखरे, कडा कॉलनी शाळेचे मुख्याध्यापक वडघणे, पत्रकार रमेश शिंदे पवार, पालक विलास डुकरे, सागर सोनटक्के, संदीप सरगैये यांच्यासह मातापालक बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपक्रमशील शिक्षिका सुनिता कर्जुले-राऊत यांनी केले तर शिक्षिका मिनाक्षी लोळगे यांनी आभार मानले. यावेळी शाळेतील शिक्षिका कामिनी बायस, संध्या लोंढे, शिक्षक साईनाथ वडते, आण्णासाहेब शिंदे, विद्या खामकर, अश्विनी मोरे, ज्योती गाडेकर, अर्चना बोकारे, प्रतिभा गाडेकर उपस्थित होते. उपस्थित विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले.

# मुख्यमंत्र्यांच्या सभेत सोन्याची चैन अज्ञाताने लांबविली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शहरातील पृथ्वी कॉर्नर येथे २० एप्रिल रोजी सायंकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभे दरम्यान गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने एका इसमाच्या गळ्यातील सोन्याची चैन लंपास केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

आप्पासाहेब शिवाजी हुडे, (वय ५३ वर्षे, रा. तांभेरे, ता. राहुरी), यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. २० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजता राहुरी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रचार सभेसाठी आप्पासाहेब हुडे हे त्यांचा मित्र बापुसाहेब मुसमाडे यांच्यासह सभेत गेले होते. सभेनंतर रात्री सुमारे ८.३० वाजता गर्दीतून बाहेर पडत असताना अज्ञात इसमाने त्यांच्या गळ्यातील अंदाजे ५६ हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन चोरी करून नेली.

या घटनेनंतर आप्पासाहेब शिवाजी हुडे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.

# गुन्हेगारांची खैर नाही, कायदा हातात घेणाऱ्यांना पोलीस निरीक्षकांचा कडक इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर नवनियुक्त पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी तालुक्यातील गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी कंबर कसली आहे. तालुक्यात कोणीही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्यास किंवा शांतता भंग करण्याचा प्रयत्न केल्यास, संबंधित गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. अंतर्गत कडक कारवाई करून त्यांना स्थानबद्ध करण्यात येईल असा सज्जड इशारा त्यांनी दिला आहे.

यावेळी पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. ज्या गुन्हेगारांवर दोन किंवा त्यापेक्षा अधिक गुन्हे दाखल



आहेत, अशा सराईत गुन्हेगारांची यादी तयार करण्यात आली आहे. या गुन्हेगारांना लवकरच पोलीस स्टेशनमध्ये बोलावून त्यांची ओळख परेड' केली जाणार आहे. या परेडच्या माध्यमातून त्यांना कडक शब्दात समज देऊन अंतिम इशारा दिला जाणार असल्याचे ढिकले यांनी स्पष्ट केले.

मागील घटनांच्या पार्श्वभूमीवर बोलताना पोलीस निरीक्षक ढिकले म्हणाले की, तालुक्यात शांतता आणि सुव्यवस्था टिकवणे ही आमची प्राथमिकता आणि कर्तव्य आहे. जे गुन्हेगार सातत्याने कायद्याचे उल्लंघन करतात आणि ज्यांच्यामुळे जनजीवनावर परिणाम होतो, अशांना कायद्याच्या चौकटीत उभे करू रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. सारख्या कडक कायद्यान्वये कारवाई करण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.नेवासा तालुक्यातील गुन्हेगारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, नागरिकांमधून मात्र पोलीस निरीक्षकांच्या या आक्रमक पवित्र्याचे स्वागत होत आहे.

# शेळ्या चोरीचा जाब विचारला म्हणून जबर मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यात शेळ्या चोरीची विचारणा केल्याने एकाला जबर मारहाण केल्याची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी ११ जणां विरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत आकाश दगडू गायकवाड (वय ३४ वर्षे, रा. राहुरी फॅक्टरी, ता. राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. २० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजेच्या सुमारास गायकवाड हे राहुरी फॅक्टरी परिसरात असताना त्यांच्या आईने फोनवरून घरातील शेळ्या चोरीस गेल्याची माहिती दिली. यानंतर ते राहुरी फॅक्टरी नाका येथे गेले असता त्यांना सोनू बाळू गायकवाड हा दिसला. त्याच्याकडे शेळ्या चोरी बाबत विचारणा केली असता त्याला राग आला. त्यानंतर सोनू गायकवाड याने फोन करून इतर साथीदारांना बोलावून घेतले. त्यामध्ये बाळू गायकवाड, शंकर गायकवाड, बबलू संजय गायकवाड, गणेश रमेश गायकवाड, राहुल गोरख गायकवाड, पिंटू गायकवाड (सर्व रा. देवळाली प्रवरा, ता. राहुरी) तसेच पाच अनोळखी इसमांचा समावेश होता. सर्व आरोपींनी एकत्र येऊन फिर्यादीस शिवीगाळ व दमदाटी करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी खाली पडले असता सोनू गायकवाड याने चॅपरने डाव्या कानाजवळ वार करून जखमी केले. तसेच शंकर गायकवाड याने लाकडी काठीने पायावर मारहाण केली, तर बबलू गायकवाड याने डाव्या डोळ्याजवळ प्रहार केला. या घटनेत गायकवाड जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# न्यू इंग्लिश स्कूलच्या माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** रयत शिक्षण संस्थेच्या, टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील एस. एस. सी. बोर्ड २००३ - ०४च्या बॅचचा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा विद्यालयात नुकताच पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक पऱ्हे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे सर्व मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी बॅचच्या दिवंगत माजी विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष



माजी मुख्याध्यापक पर्हे यांनी माजी विद्यार्थ्यांनी हा स्नेहमेळावा ठेवल्याबद्दल माजी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. सर्वांनी जीवनात सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन केले .यावेळी माजी शिक्षक दहिफळे यांच्यासह अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी अनेक माजी विद्यार्थी व माजी शिक्षकांनी विद्यालयाप्रती असलेल्या आपल्या भावना व्यक्त केले. यावेळी सविता पटारे मोहोळ ,सोनाली मगर. अर्चना नागवडे ,कृष्णा भालेराव, विलास पटारे,किरण जाधव, महेश मगर, विनायक बोरुडे ,प्रमोद राव, गणेश दुल्लम, सागर

रणनवरे, सोमनाथ राऊत, मनोज औटी, वृषाली कोकणे, योगिता तुवर, कावेरी पांडांगळे मनोज औटी यांनी मनोगत व्यक्त केले .२००३ - ०४ च्या बॅचने कृतज्ञतेच्या भावनेतून विद्यालयासाठी ५००० लिटर पाण्याची टाकी बांधून देण्याचे व वस्तीगृहास वस्तू स्वरूपात ५००० ची देणगी देण्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रविंद्र बनकर ,सूत्रसंचालन स्वाती पटारे , गोकुळ मोरे यांनी तर आभार संभाजी पटारे यांनी व्यक्त केले.

# राहुरी बस स्थानकाच्या कामाला गती द्या : माजी खा. प्रसाद तनपुरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी |** येथील अद्ययावत बस स्थानकाच्या सुरू असलेल्या बांधकामाला गती देण्याच्या सूचना माजी खासदार प्रसाद तनपुरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. बस स्थानकाच्या कामाची पाहणी करताना त्यांनी येत्या दोन महिन्यांत काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

तनपुरे म्हणाले, या प्रकल्पासंदर्भात येणाऱ्या सर्व अडचणी तातडीने दूर करून कामाला अधिक वेग द्यावा. प्रवाशांच्या सुविधांचा विचार करून दर्जेदार काम होणे आवश्यक आहे.

यावेळी श्रीरामपूर आगार प्रमुख अनिल बेहेरे, विभागीय अभियंता संजय दरेकर, राहुरीचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपाध्यक्ष गजानन सातभाई, नगरसेवक रवींद्र आहेर, बबनराव गुलदगड, प्रदीप भुजाडी, सूर्यकांत भुजाडी, निलेश जगधने, दत्तात्रय येवले, आरिफ शेख आदी उपस्थित होते.

गेल्या अनेक दिवसांपासून राहुरी बस



स्थानकाचे नूतनीकरणाचे काम सुरू असून विविध अडथळ्यांवर मात करत प्रकल्पाला सुरुवात करण्यात आली आहे. या कामासाठी प्रसाद तनपुरे यांनी सुरुवातीपासून सातत्याने पाठपुरावा केला आहे. शासन स्तरावरील परवानग्या, बांधकामातील अडचणी, प्रवाशांच्या सुविधा याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले.

ठेकेदाराने १ जुलै २०२६ पर्यंत काम पूर्ण करण्यासाठी गतीने हालचाली कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. बस स्थानक परिसरात मोकळ्या जागेत नगरपालिकेमार्फत वृक्षारोपण करून सुशोभीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच पावसाळ्यात पाणी साचणार नाही यासाठी योग्य निचरा व्यवस्था करावी, सुलभ व स्वच्छ शौचालयाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

व्यापारी संकुलासाठी राखीव जागेबाबत आराखड्यात कोणताही बदल करू नये, असे स्पष्ट करताना तनपुरे यांनी राहुरी बस स्थानक जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असल्याने ते आकर्षक व स्वच्छ असावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

तनपुरे यांच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्यात येईल, असे विकासकाने सांगितले. परिवहन महामंडळ, नगरपालिका आणि ठेकेदार यांच्या समन्वयातून प्रकल्प वेळेत पूर्ण होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# नांदूर परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी:** बाथरुमसाठी बाहेर जात आहे, असे सांगून घरातून बाहेर पडलेल्या अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तीला पळवून नेल्याची घटना राहुरी तालुक्यातील बारागांव नांदुर परिसरात दि. २२ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास घडली.

एक १३ वर्षे ५ महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी तीच्या कुटुंबासह राहुरी तालुक्यातील बारागांव नांदुर परिसरात राहते. दि. २२ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास पिडीत मुलगी बाथरुमसाठी बाहेर जात आहे, असे सांगुन घरामधुन बाहेर निघुन गेली. त्यानंतर खुप वेळ झाला तरी ती परत आली नाही. या दरम्यान अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी पिडीत मुलीचे अपहरण करून तीला फूस लावून पळवून नेले. नातेवाईकांनी तीचा आजुबाजुला व परीसरात शोध घेतला. परंतु ती कोठेही मिळुन आली नाही.

पिडीत मुलीच्या वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा रजि. नं. ४११/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# चिंचोली गुरवमध्ये सिमेंट पाईप टाकण्याचे काम सुरू



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळी भागाला पाणी मिळावे याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी निळवंडे धरण व कालवे पूर्ण केले. लाभक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना पाणी मिळावे याकरता त्यांनी पूर्ण नियोजन केले होते मात्र सध्याचे सरकार उदासीन असल्याने आपल्या शेतकऱ्यांसाठी थोरात कारखान्याच्या पुढाकारातून सिमेंट पाईप टाकून पाणी नेण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

चिंचोली गुरव येथील जाते खाणी बंधारा ते शिवाचा मळा येथे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून सिमेंट पाईप टाकण्याचे काम सुरू करण्यात आले. यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले, संचालक संपतराव गोडगे, सरपंच विलास सोनवणे, विलास मास्तर सोनवणे,संदेश गोडगे, विजय गोडगे, डॉ.सुहास आभाळे, लक्ष्मण सोनवणे, प्रताप गोडगे, सतीश गोडगे, बबन गोडगे,भास्करराव पानसरे,राजेंद्र गोडगे,विनोद गोडगे, हरि वाघ, भाऊसाहेब गोडगे,वैभव आभाळे,रवि वाणी,भाऊसाहेब वाणी, अनिल गोडगे,विनोद गोडगे आदींसह विविध ग्रामस्थ उपस्थित होते. निळवंडे डाव्या कालव्यातून चिंचोली गुरव मध्ये कारखान्याच्या माध्यमातून पाणी आले असून जाते खाणी बांधारा ते शिवाचा मळा या दोन किलोमीटर लांबीच्या अंतरावर सिमेंट पाईप टाकण्यात येणार आहे.

यावेळी बोलताना पांडुरंग पाटील घुले म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी धरण व कालवे पूर्ण केले. मात्र पाणी वाटपाच्या वेळेस दुर्दैवाने ते नाही तरीही सर्व भागाला पाणी मिळाले पाहिजे यासाठी त्यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. कारखान्याच्या माध्यमातून विविध शेतकऱ्यांना सिमेंट नळ्या दिल्या आहेत त्यामुळे नालाबर्डी बंधाऱ्यांमध्ये पाणी टाकले जात आहे. सध्याचे सत्ताधारी ज्यांना हा परिसर माहिती नाही ज्यांना शेतकऱ्यांचे काही देणे - घेणे नाही ते फक्त फोटोसाठी येत आहेत. काम आपल्यालाच करायचे आहे. शेतकरी राजा हा लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्यात पाठीशी आहे. आणि या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी माजीमंत्री बाळासाहेब थोरात हेच पाणी देणार आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी कारखाना सातत्याने मदत करेल असे ते म्हणाले.

तर संपतराव गोडगे म्हणाले की, थोरात कारखान्याच्या माध्यमातून या परिसरामध्ये विविध गावांना पाणी देण्याचे काम केले आहे. देवकवठे येथेही कारखान्याने सिमेंट पाईप देऊन पाणी पुढे नेण्यासाठी सर्व यंत्रणांसह मोठी मदत केली आहे.

चिंचोली गावच्या काही भागाला यामुळे पाणी मिळाले आहे सर्व भागाला पाणी देण्यासाठी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातूनच प्रयत्न होत असल्याचे ते म्हणाले.

## नेवासा न्यायालयाची विकास लवांडेस कारणे दाखवा नोटीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रवक्ते यांनी दिनांक १६ एप्रिल रोजी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) गटाचे ऑफिस मध्ये पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्रातील २० संत महंत यांचेवर विविध आरोप करून त्यांना घुसखोर म्हणून जाहीर केले व त्यांचेवर प्रतिगामी असा ठपका लावून बदनामी केली. तसेच त्यानंतर ही फेसबुक पेज चे माध्यमातून बदनामी सुरू ठेवली. यावरून नेवासा न्यायालयाने विकास लवांडे यास कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. नेवासा येथील विश्व हिंदु परिषदेचे जिल्हा धर्माचार्य संपर्क प्रमुख प्रशांत बहिरट यांनी नेवासा पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करून घेण्याची विनंती केली, नेवासा पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल करून घेतला.

सदर व्यक्तिविरुद्ध एफ आय आर दाखल करून तपास व्हावा म्हणून नेवासा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी वर्ग १ यांचे न्यायालयात प्रायव्हेट कंप्लेंट दाखल करण्यात आली. त्याचा नंबर इतर किरकोळ फौजदारी चौकशी अर्ज नंबर ९८/२०२६ असा असून सदर प्रकरण प्रथम वर्ग न्यायाधीश एल. ए. काळे यांचे समोर सुनावणीस आले असता ड. मयूर वाखुरे यांनी प्राथमिक युक्तिवाद केल्यानंतर सदर प्रकरणात विकास लवांडे यांना कारणे दाखवा नोटीसचा आदेश पारित करण्यात आला आहे. विकास लवांडे यांना नेवासा न्यायालयात हजर राहून त्यांची बाजू मांडावी लागणार आहे. या प्रकरणात पुढील तारीख २२ मे पडली असून, विकास लवांडे हजर राहणार का यावर चर्चा रंगली आहे. सदर नोटीस निघाल्याने सकल हिंदू समाजाचे वतीने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## दान कर्माने आयुष्यात परिपूर्णता प्राप्त होते : राजेंद्र पिंपळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वी खुर्द** : डिग्रस (ता. संगमनेर) येथे आयोजित कार्यक्रमात दान कर्माच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्ती आपल्या आयुष्यात परिपूर्णता प्राप्त करू शकते, असे प्रतिपादन वरिष्ठ केंद्रीय शिक्षक राजेंद्र पिंपळे यांनी केले.



दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, डिग्रस ग्राम शाखेतर्फे आश्वी खुर्द येथील श्रामणेर संघाला भोजनदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पिंपळे बोलत होते. ते म्हणाले, अशांत जगाला दुःखातून बाहेर काढून शांततेचा मार्ग दाखविण्यासाठी भगवान बुद्धांनी धम्म दिला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून समाजात चैतन्य निर्माण झाले आहे. तरुणांनी सम्यक दृष्टी ठेवून धम्म कार्यात सातत्य राखले पाहिजे. गावातील एकोपा आणि सामाजिक बांधिलकी यामुळेच समाज प्रगतीपथावर जाईल. कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्रिरत्न धम्मरथातून श्रामणेर संघाचे आगमन झाले.

स्थानिक महिला ग्रामशाखा अध्यक्षा मनिषा भालेराव यांच्या पुढाकाराने पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष यमदास मुन्तोडे, तालुका सरचिटणीस राजू मुन्तोडे तसेच बौद्धाचार्य रोहिदास मुन्तोडे यांनीही मार्गदर्शन केले. त्रिरत्न धम्मरथ मिरवणुकीचे नियोजन बौद्धाचार्य सुशिल मुन्तोडे यांनी केले, तर श्रेया मुन्तोडे व हर्षल पवार यांनी सहकार्य केले. कार्यक्रमात सुभजीत मुन्तोडे यांच्या भीमगीताने वातावरण भारावून गेले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कविता, सखुबाई, माधुरी, मिनाक्षी, रेखा, चंद्रकला, सिमा, शिल्पा, लता, रूपाली भालेराव यांच्यासह शिवाजी, भाऊसाहेब, रावसाहेब, रविंद्र, विनोद, प्रभाकर, शरद, सतिश, सुनिल, योगेश भालेराव यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जिओ टीव्ही कॉमच्या टॉवर मधून बॅटऱ्यांची चोरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील देसवंडी येथील रिलायन्स जिओ टेलिकॉमच्या टॉवरमधून सुमारे ७५ हजार रुपये किमतीच्या बॅटर्यांची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या बाबत संतोष रामभाऊ साळवे (वय ४० वर्षे, रा. आगाशेनगर, श्रीरामपूर) यांनी फिर्याद दिली आहे. ते रिलायन्स जिओ टेलिकॉममध्ये गेल्या तीन वर्षांपासून सुपरवायझर म्हणून कार्यरत असून दि. १७ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास राहुरी तालुक्यातील टेक्निशियन गणेश बानकर यांनी साळवे यांना फोनद्वारे देसवंडी येथील जिओ टॉवर बंद पडल्याची माहिती दिली. त्यानंतर सकाळी साळवे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता टॉवरमधील ओ.डी.सी. रॅकमधून बॅटर्या चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. चोरी गेलेल्या वस्तूंमध्ये कॉसलाईट १०० एएच कंपनीच्या पाच बॅटर्यांचा समावेश असून प्रत्येक बॅटरीची किंमत सुमारे १५ हजार रुपये आहे. एकूण ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. संबंधित बॅटर्यांचे सिरीयल क्रमांकही पोलिसांना देण्यात आले आहेत. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ३९६/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## उच्च न्यायालयाचा नानासाहेब गलांडे यांना दिलासा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : उंदीरगाव (ता. श्रीरामपूर) येथील २६ ऑगस्ट २०२३ रोजीच्या ट्रॅासिटी प्रकरणात नाव समाविष्ट झालेल्या नानासाहेब काशिनाथ गलांडे यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मोठा दिलासा दिला आहे. तपासादरम्यान कोणताही ठोस पुरावा आढळून न आल्याने, या प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत कनिष्ठ न्यायालयाने गलांडे यांच्या विरोधात कोणतीही कारवाई करू नये तसेच दोषारोप निश्चित करू नयेत, असे स्पष्ट आदेश न्यायमूर्ती अभय जे. मंत्री यांनी दिले आहेत. न्यायालयात गलांडे यांच्या वतीने ॲड. आर.आर. कर्पे यांनी युक्तिवाद करताना तपास अधिकाऱ्यांच्या अहवालाचा दाखला दिला. त्या अहवालात गलांडे यांच्या विरोधात कोणताही भक्कम पुरावा नसल्याचे नमूद करण्यात आले होते. तसेच नजरचुकीमुळे त्यांचे नाव दोषारोप पत्रात समाविष्ट झाल्याचे सांगत आरोपींच्या यादीतून त्यांचे नाव वगळण्याची विनंतीही तपास अधिकाऱ्यांनी केली होती. सरकार पक्षाच्या वतीने अतिरिक्त सरकारी अभियोक्ता एन.डी. राजे यांनीही या बाबीला विरोध दर्शविला नाही. त्यांनीही गलांडे यांच्या विरोधात ठोस पुरावा नसल्याचे मान्य केले.

## इंटरक्टिव बोर्डमुळे मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ता सुधारते : सुनिल गडाख

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**चांदा** : नेवासा तालुक्यातील सांगवी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला इंटरअक्टिव बोर्डचे माजी जिल्हा परिषद सदस्य सुनील गडाख यांच्या हस्ते नुकतेच प्रदान करण्यात आले.



दिनांक २४ एप्रिल रोजी लोकसहभागातून खरेदी केलेल्या इंटरक्टिव बोर्डचे मा. जिल्हा परिषद सदस्य सुनिल भाऊ गडाख यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना सुनील भाऊ गडाख म्हणाले की इंटर ॲक्टिव्ह बोर्डमुळे मुलांच्या गुणवत्ता वाढीसाठी व शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी मदत होते असे यावेळी ते बोलताना म्हणाले तसेच या शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकांचे त्यांनी कौतुक केले. याच वेळी विविध स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला तसेच स्वरा गोकुळ कर्डिले,साईश्री होले,वैष्णवी कर्डिले,तनुजा कर्डिले,समृद्धी कर्डिले व गिरीश कर्डिले या विद्यार्थ्यांनी राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविल्याबद्दल त्यांचे सर्व ग्रामस्थ व पालक यांनी कौतुक केले.

याप्रसंगी कायझेन अकॅडमीचे संचालक महेश डाळिंबकर यांनी स्पर्धा परीक्षेविषयी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

# हा उकाडा सोसवेना.....

## उन्हाच्या तीव्रतेमुळे दुपारी रस्ते निर्मनुष्य

गणेश कुंभकर्ण । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** : वाढत्या तापमानाच्या पाऱ्यामुळे कोल्हार भगवतीपूर परिसरातील नागरिक चांगले हैराण झाले असून आग ओकणाऱ्या सूर्यामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचे चित्र दिसत आहे सकाळी दहा वाजेपासूनच उन्हाचे चटके बसायला सुरुवात होते तर दुपारी बारा ते चार पर्यंत उन्हाची तीव्रता अधिक वाढते त्यामुळे कोल्हारकर नागरिकासह परिसरातील नागरिक घराबाहेर पडणे टाळत असल्याने कोल्हार भगवतीपुर परिसरातील रस्ते दुपारच्या वेळी निर्मनुष्य दिसत असल्याने इतना सन्नाटा क्यों है भाई असं म्हणण्याची वेळ येथील व्यापारी पेठेतील व्यापारी वर्गावर आली आहे. दुपारी अगदी सन्नाटा असलेल्या व्यापारी पेठेत चार नंतर खरेदी विक्रीसाठी ग्राहकांची गर्दी दिसते. त्यामुळे सायंकाळच्या वेळी बाजार पेठ गर्दीने फुललेली असते उन्हाच्या तीव्रतेमुळे शुक्रवारी आठवडे बाजारात देखील दुपारी चार नंतरच नागरिक भाजी बाजार करण्यासाठी बाहेर पडत असल्याने आठवडे बाजाराच्या गर्दीवरही या तीव्र उन्हामुळे परिणाम झाल्याचे चित्र सध्या दिसत आहे.




उन्हाच्या तीव्रतेमुळे दुपारच्या वेळी कोल्हार चे रस्ते निर्मनुष्य होत असल्यानेअघोषित संचारबंदी असल्याचे भासते.

छाया (गणेश कुंभकर्ण)

आग ओकणाऱ्या सूर्या मुळे शरीराची लाहीलाही करणाऱ्या उष्णतेपासून बचाव करण्यासाठी शीतपेयांना मागणी वाढली असून अगदी आवश्यक काम असेल तर कोल्हारकर नागरिक घराबाहेर पडताना छत्री टोपी व उपरणे डोक्यावर घेऊन उन्हापासून बचाव करीत करीत आवश्यक कामे करताना दिसत आहे उष्णतेपासून होणाऱ्या आजारांमुळे देखील दवाखान्यात रुग्णांची संख्या वाढली आहे. काल शनिवारी सकाळपासूनच वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे घरातील व दुकानातील पंखे कुलर बंद राहिल्याने कोल्हार चे नागरिक व पेठेतील व्यापारी उकाड्याने चांगलेच हैराण झाले होते चार वाजेनंतर वीज पुरवठा सुरळीत झाल्यावर नागरिकांना हायसे वाटले एकूणच यंदा तीव्र उन्हाळ्यामुळे हा उकाडा सोसवेना असे म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

## पायरेन्स आयबीएमएच्या १६ विद्यार्थ्यांची मुंबईतील कंपनीत निवड



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : पायरेन्स संस्थेच्या लोणी येथील इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन (आयबीएमए)ने प्लेसमेंट क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत तब्बल १६ विद्यार्थ्यांची इंटिग्रेटेड एंटरप्रायझेस इंडिया प्रा. लि., मुंबई या प्रतिष्ठित कंपनीत निवड झाली आहे. अशी माहिती संस्थेचे संचालक डॉ. मोहसिन तांबोळी यांनी दिली. इंटिग्रेटेड एंटरप्रायझेस इंडिया प्रा. लि. ही व्यवसाय मार्गदर्शन, वित्तीय सेवा, विक्री व्यवस्थापन आणि प्रादेशिक संचालन क्षेत्रात कार्यरत कंपनी आहे. संस्थेतील ओंकार वर्पे, भक्ती मते, वैष्णवी मोटे, पूजा पटाट, ललित सोळंकी, मनोज सोनवणे, वैष्णवी जाधव, सायली रणछोड, यामिनी वाघ, श्रद्धा नागपुरे, श्वेता शिंदे, साक्षी भांड यांची रिलेशनशिप मॅनेजर पदावर, सरिका थोरात व योगेश कुमावत यांची डीलर पदावर, तर गायत्री देशमुख आणि रोहित ढोकचौळे यांची फायनान्स एक्झिक्युटिव्ह पदावर नियुक्ती झाली आहे. अशी माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. निलेश आवारी यांनी दिली. पायरेन्स आयबीएमएने शैक्षणिक गुणवत्ता, आधुनिक अध्यापन पद्धती आणि उद्योगसुसंगत अभ्यासक्रमाच्या माध्यमातून स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. संस्थेचे विद्यार्थी सातत्याने राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड होत असून ही संस्था करिअर घडविणारे विश्वासार्ह केंद्र म्हणून उदयास येत आहे.

## द•ख•ल

### विद्यार्थ्यांनी सातत्याने अभ्यास करून आपले ध्येय गाठावे : दत्तात्रय खाटीक



**कुकाणा** : विद्यार्थ्यांनी सातत्याने अभ्यास करून आपले ध्येय गाठावे, कष्ट, जिद्द, प्रामाणिकपणा व चिकाटी यांचा संगम म्हणजे असला की निश्चितच यश प्राप्ती होते असे प्रतिपादन नेवासा मार्केट कमिटीचे संचालक दत्तात्रय खाटीक पाटील यांनी केले. नेवासा तालुक्यातील पाथरवाला येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व इयत्ता पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ प्रसंगी ते अध्यक्षीय भाषणातुन बोलत होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश खाटीक उपाध्यक्ष वीरेंद्र थोरे पाथरवाला माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक रमेश खाटीक , अध्यापक इस्माईल शेख, नरेंद्र खाटीक, सचिन खारगे , गणेश लाड हे प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते. अध्यापक भाऊसाहेब राऊत यांनी प्रास्ताविक केले.

### श्रीराम ॲकेडमीचा सी.बी.एस.ई. बोर्ड परीक्षेत १००% निकाल



**श्रीरामपूर** : दरवर्षीप्रमाणे श्रीराम ॲकेडमी शाळेने C.B.S.E. बोर्डातील परीक्षेत १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे. सदर परीक्षेत नमिष अग्रवाल या विद्यार्थ्याने ९७.८% गुण मिळवून तालुका व शाळेत प्रथम क्रमांकाचा मान मिळविलेला आहे. तसेच दर्श सेवक ९७.६%, कु. मोक्षा गोहील ९४%, कु. पूर्वा राणेजा ९३%, कु. श्रीजा शिंदे ९२.६% व जय मरलेचा ९९.६% हे सर्व विद्यार्थी ९० टक्क्यांच्या पुढील गुणांच्या श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच नमिष अग्रवाल, मोक्षा गोहील, दर्श सेवक व जय मरलेचा या विद्यार्थ्यांनी IT या विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. सदर शाळेच्या यशस्वी निकालासाठी सर्व विद्यार्थी, शिक्षक वृंद, पालकवर्ग यांनी मेहनत घेतली आहे. सदर परीक्षेतील यशाबद्दल शाळेचे चेअरमन राम टेकावडे, खजिनदार जन्मेजय टेकावडे, प्राचार्या पोटघन, सल्लागार समिती सदस्या उषा मुंदडा, बाळासाहेब ओझा, ॲड. औताडे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

### प्रदीप कुंढारे यांची नाशिक पोलीस दलात निवड



**कुकाणा** : नेवासा तालुक्यातील वरखेड येथील जयसिंग कुंडारे यांचे चिरंजीव प्रदीप याने नाशिक पोलीस दलात घवघवीत यश संपादन करून आपले स्थान निर्माण केले आहे. प्रदिप याचे प्राथमिक शिक्षण वरखेड येथे झाले असुन लहानपणा पासुनच पोलिस दलात जाण्याची इच्छा त्यानुसारच आपला व्यायाम व आहार आणि अभ्यास याकडे लक्ष केंद्रीत केले. प्रदीपने कठोर परिश्रम ,जिद्द आणि चिकाटीच्या बळावर परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी बजावून आपली गुणवत्ताही सिद्ध केली, त्याच्या या यशामागे कुटुंबीयांचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न याचा मोठा वाटा आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे. प्रदीपच्या यशामुळे वरखेड गावचे नाव उज्वल झाले त्याच्या या यशातुन युवक - युवतींना प्रेरणा मिळाली आहे. मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते हे प्रदीप ने आपल्या यशातून दाखवून दिले त्याच्या या निवडीबद्दल नातेवाईक ,मित्रपरिवार व ग्रामस्थांनी त्याचा सत्कार करून अभिनंदन केले.

### सोपान पवार याचे कर्मवीर विद्याप्रबोधनी परीक्षेत सुयश



**टाकळीभान** : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत स्पर्धा प्रमाणपत्र परीक्षेमध्ये टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता सातवीचा विद्यार्थी कुणाल सोपान पवार याने संपूर्ण संस्थेमध्ये तृतीय क्रमांक संपादन केला आहे.कुणाल पवार याच्या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बापूसाहेब पटारे, स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य व टाकळीभान सोसायटीचे चेअरमन मंजाबापू थोरात, राहूल पटारे, विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. एम. शिंदे , पर्यवेक्षक एस.एस जरे, व शिक्षण प्रेमींनी त्याचे अभिनंदन केले आहे.

### महामानव फाउंडेशनकडून शालेय साहित्याचे वाटप

**शिर्डी** : महामानव फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून गरजवंता शालेय साहित्याचे वाटप नुकतेच करण्यात आले. महामानव फौडेशनचे प्रमुख शिमोन जगताप यांच्या संकल्पनेतून सदर कार्यक्रम निमगाव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारकात पार पडला. २३ एप्रिल जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून वंचीत विद्यार्थ्यांच्या पाठीवर मायेची थाप म्हणून शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी जगताप म्हणाले की,विद्येविना मती गेलेल्या समाजाला ज्यांनी ज्ञानाचा प्रकाश दिला, ज्यांनी रयतेच्या पोरांना स्वतःच्या पायावर उभं केलं आणि ज्यांनी शिका असा मंत्र दिला, त्या महामानवांच्या जयंतीला केवळ हार घालून किंवा घोषणा देऊन आपण त्यांचे ऋण फेडू शकत नाही. तुमच्या खिशातील एक छोटासा हिस्सा, एखाद्या पोराचं वर्षभराचं शिक्षण वाचवू शकतो. जेव्हा एखादा गरजू मुलगा नवीन कोरी वही आणि नवीन दप्तर घेऊन शाळेत जाईल, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर जे हसू असेल, तीच आपल्या महामानवांना मिळालेली खरी मानवंदना ठरेल असे जगताप म्हणाले.

# पान १ वरुन

## नदीजोड प्रकल्पच्या माध्यमातून राज्य दुष्काळमुक्त करणार–मुख्यमंत्री फडणवीस

केलेले बारव आजही सुस्थितीत असून त्याचे संवर्धन राज्य शासन करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. अहिल्यादेवी होळकर यांनी नद्यांचे महत्व जाणले आणि नदी प्रदूषण रोखण्याचे प्रयत्न केले. महिला, गरीब आदिवासीना समाजाच्या मुख्य धारेत आणण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांचे विचार आजही महत्वाचे आणि मार्गदर्शक असून छत्रपती शिवाजी महाराज आणि अहिल्यादेवी यांच्यासारख्या महान व्यक्तींच्या विचारांच्या आधारेच शाश्वत विकास साधता येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले. मंत्री विखे पाटील म्हणाले, त्र्यंबकेश्वर आणि चौंडी येथून दोन यात्रा सुरू होत असून मध्य प्रदेशातील माहेश्वर येथे नर्मदातीरी समारोप होणार आहे. राज्यातील ३० नदीखोऱ्यांतील पाणी कलशांच्या माध्यमातून नर्मदेला अर्पण करण्यात येईल. गोदावरी आणि नर्मदेचे महात्म्य लक्षात घेऊन आणि विचार, वारसा आणि विकास ही त्रिसुत्री घेऊन यात्रेच्या माध्यमातून जलसंवर्धनाचा संदेश देण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी केलेले जलसंवर्धनाचे कार्य जनतेत रुजविण्याचा प्रयत्न या यात्रेद्वारे करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. नागरिकांनी या यात्रेत सहकार्य करावे असे आवाहनही विखे पाटील यांनी केले.

आण्णासाहेब मोरे म्हणाले, जलसाक्षरतेचे विचार सेवेकऱ्यांमार्फत पोहोचविण्यात येत आहेत. गुरुपिठाच्या माध्यमातून नदी स्वच्छता उपक्रम राबविण्यात येत आहेत. देशाच्या विकासासाठी थोरामोठांचे विचार भारतभर पोहोचविण्याचे काम करावे लागतील. संस्कृती, संस्कार केले तर देश बलशाली आणि विकसित होईल. नवीन पिढीने निर्व्यसनी राहून देशाचे संस्कारदूत बनावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्र्यांच्या आगमनाने कुंभमेळ्याच्या कामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करून कुंभमेळ्यात गर्दीचे नियोजनाबाबत त्यांनी सूचना केल्या.

युवराज होळकर म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी जलव्यवस्थापनाची सुरुवात नर्मदा येथे केली. जलसाक्षरता आणि जलव्यवस्थापन ही काळाची गरज आहे. गोदावरी आणि नर्मदेला जोडून 'एक भारत श्रेष्ठ भारत'चा संदेश दिला जाणार आहे. गोदावरी महाराष्ट्राची तर नर्मदा मध्यप्रदेशची जीवनधारा आहे.

जन्मभूमी ते कर्मभूमी जलयात्रेचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. अहिल्यादेवींनी सुरू केलेली फड पद्धती उपयुक्त असून ती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या हस्ते कुशावर्तातील जलकलश मुख्यमंत्री फडणवीस यांना सुपूर्द करण्यात आला आणि राज्यातील ३० नदीखोऱ्यांतील पाणी कलशांच्या माध्यमातून आणून त्याचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. केदार कंठशिखर वयाच्या सहाव्या वर्षी सर करणाऱ्या चिमुकल्या मनकर्णिका देशपांडे हिचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. 'गोदा ते नर्मदा जलयात्रा २०२६' या गीताचे विमोचन आणि उन्नत नाशिक अभियानाच्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमापूर्वी श्री. विखे पाटील यांनी सपत्नीक १०८ कन्यकांचे पूजन केले.

शालिनीताई विखे पाटील पाटील, त्र्यंफकेश्वरच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, ह.भ.प.संजय नाना धोंगडे, महंत उद्धव महाराज मंडलिक, मंदाकिनी मोरे, महामंडलेश्वर रामचंद्रदास मोरे, उपमहापौर विलास शिंदे आदी उपस्थित होते.

'जल व्यवस्थापन कृती पंधरवड्या' अंतर्गत आयोजित या जलयात्रेचा मुख्य उद्देश राज्यातील जलस्त्रोतांबाबत जनजागृती करणे, लोकसहभाग वाढवणे आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाची संकल्पना अधिक बळकट करणे हा आहे. ही जलयात्रा २५ एप्रिल ते २९ एप्रिल या कालावधीत महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील विविध जिल्ह्यांतून प्रवास करणार आहे. यात्रेत सुमारे ५०० जलयात्री, वारकरी आणि तरुण सहभागी झाले आहेत.

## शिरूरमध्ये रुग्णवाहिकेअभावी रस्त्यावर प्रसूती

शिरूरमधील जोशीवाडी येथील एक गरोदर महिला शनिवारी सकाळी प्रसूतीसाठी शिरूर ग्रामीण रुग्णालयात पायी निघाली होती. मात्र, जात असतानाच शहरातील 'निर्माण प्लाझा' परिसरात पोहोचल्यानंतर तिला प्रसूती कळांचा तीव्र त्रास सुरू झाला. कळा इतक्या असह्य होत्या की त्या महिलेला पुढे पाऊल टाकणेही कठीण झाले आणि ती वेदनेने विव्हळत रस्त्याच्या कडेलाच बसली.रस्त्याच्या कडेला वेदनेने विव्हळणाऱ्या या महिलेला पाहताच परिसरातील महिलांनी कोणताही विचार न करता मदतीसाठी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून या महिलांनी तातडीने घरातून साड्या आणि स्कार्फ आणले. भररस्त्यात या कापडांचा आडोसा (कणगा) तयार करून एक तात्पुरती 'लेबर रूम' उभी केली. उपस्थित महिलांनी धीर दिल्यानंतर या मातेने रस्त्यावरच एका गोंडस बाळाला जन्म दिला. रस्त्यावर उतरून माणुसकी धर्म निभावणाऱ्या त्या अज्ञात 'सावित्रीच्या लेकींचे' संपूर्ण शिरूर शहरात कौतुक होत आहे.

## मराठी शिकवणार; पण जबरदस्ती नाही

संतुलित भूमिका घेत ते म्हणाले की, जुना परवाना नूतनीकरण करताना चालकांची मराठी भाषाही तपासली जाईल. एखादा चालक मराठीत संवाद साधण्यास असमर्थ आढळल्यास, त्याचा परवाना रद्द केला जाऊ शकतो. अनेक बाहेरील आणि परदेशी नागरिकांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे परवाने मिळवल्याची तक्रार भाजप आमदार नरेंद्र मेहता यांनी केल्यानंतर हा मुद्दा निर्माण झाला. या संवेदनशील विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, सरकारचा उद्देश भाषेला प्रोत्साहन देणे आहे, वाद निर्माण करणे नाही. मुंबई असो वा संपूर्ण महाराष्ट्र, मराठीला प्राधान्य देणे हे आमचे कर्तव्य आहे. मात्र, कोणावरही भाषा लादणे चुकीचे आणि हिंसाचाराला प्रोत्साहन देणारे आहे, असे आमच्या सरकारचे मत आहे. ज्या चालकांना मराठी येत नाही, त्यांना आम्ही मराठी शिकवू. कोणावरही अन्याय होणार नाही, हे सुनिश्चित करण्यासाठी विशेष प्रशिक्षण दिले जाईल.

अंमलबजावणी लोकशाही मार्गाने

राज्य सरकार प्रशासन आणि सार्वजनिक सेवेत मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, देवेंद्र फडणवीस यांनी त्याला एक सर्वसमावेशक वळण देण्याचा प्रयत्न केला आहे. मराठीच्या मुद्द्यावर सरकार ठाम आहे, परंतु त्याची अंमलबजावणी लोकशाही आणि सहयोगात्मक पद्धतीने केली जाईल, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## देव देश धर्माकरता सदैव जागृत रहा

अशी प्रार्थना त्यांनी केली,आपल्याला कोनाविरुद्ध दंड थोपटायांचे नाहीतर त्यांचे दंड दाबायचे आहे,कारण दंड थोपटले तर एक दिवस तो फ्रॅक्चर होऊन जाईल असा संदेश देत आईवडीलांच्या सेवेमध्ये अंतर देऊ नका, आईवडीलांसमोर नियम शास्त्रे असेल तर ते बाजूला ठेवा,शेवटच्या श्वासापर्यंत आईवडीलांची सेवा करा असे आवाहन त्यांनी केले.

आपला धर्म व देशातील माणुसकीमुळे भारतातील प्रत्येक पुरुष हा रामाचा अवतार असून आपल्या देशातील महिला ही सीतामाईचा अवतार आहे,रामाने आचार व नियम दिला तर सीता मातेने कर्तृत्व दिले अशी पाश्चात्य लोकांची धारणा आहे हीच धारणा आपल्यात रुजावी व प्रभू रामचंद्रांने निरहेतुकपणे हे कार्य करून घ्यावे अशी प्रार्थना त्यांनी यावेळी बोलतांना केली.यावेळी उपस्थित संत महंत मंडळींचे संतपूजन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबा व देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी बाबांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी झालेल्या किर्तन सोहळयाच्या प्रसंगी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले वारकरी संप्रदायातील संत महंत, कीर्तनकार,प्रवचनकार,भजनी मंडळाचे सेवेकरी,पंचक्रोशीतील पुरुष,युवक सेवेकरी, महिला भाविक उपस्थित होते.उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून गंगापूजन व किर्तन सोहळयाची भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.

# कायनेटिक चौक परिसरात पाणीटंचाई

### टँकरने पाणीपुरवठ्याची नगरसेवक मनोज कोतकर यांची मागणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातील कामयनेटिक चौक परिसरातील विविध भागांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने पाण्याची मागणी वाढली आहे; मात्र महापालिकेच्या नळाद्वारे सुरळीत व पूर्ण दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

या पार्श्वभूमीवर नगरसेवक मनोज कोतकर यांनी स्थायी समितीच्या बैठकीत हा प्रश्न ठळकपणे उपस्थित केला. त्यांनी स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे व प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले की, कायनेटिक चौक परिसरातील नागरिकांना सध्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नळाद्वारे पाणीपुरवठा नियमित व पुरेशा दाबाने होत नसल्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. जर नळाद्वारे मुबलक पाणीपुरवठा करणे शक्य नसेल, तर या भागात तात्काळ पाण्याचे टँकर सुरू करण्यात यावेत.

अहिल्यानगर शहरात दरवर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण होतो, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. प्रशासनाने केवळ तात्पुरते उपाय न करता कायमस्वरूपी नियोजन करणे आवश्यक आहे.

कायनेटिक चौक परिसरातील नागरिकांना दररोज पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना विशेषत अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करून नागरिकांना दिलासा द्यावा, तसेच भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी ठोस पावले उचलावीत. अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल यासाठी पण प्रशासनाने तातडीने उपयोजना करून पाणीपुरवठा सुरळीत व पूर्ण दाबाने देवा अन्यथा टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा अशी मागणी नगरसेवक मनोज कोतकर यांनी स्थायी समितीच्या बैठकीत केली

# कृषि विभागाच्यावतीने गोसावी यांचा सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** कृषी विभागामार्फत माहत्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत दिल्या जाणाऱ्या उत्कृष्ट फळ लागवड कार्यक्रमा अंतर्गत आव्हाणे बु येथील व सध्या शेवगाव तालुक्यातील वाडगाव सजाचे सहाय्यक कृषी अधिकारी प्रदीप उत्तमगिर गोसावी यांना तालुक्यात तृतीय क्रमांक मिळवला असुन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे तसेच उपविभागीय कृषी अधिकारी श्रीरामपूर प्रवीण गोसावी यांच्या हस्ते त्यांना सन्मान चिन्ह प्रदान करण्यात आले.

प्रदीप गोसावी,यांनी तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली वाडगाव शिवारात उत्कृष्ट फळ लागवड या कार्याबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत उत्कृष्ट फळ लागवड योजने अंतर्गत प्रत्यक्ष शेतावर जाऊन फळबागेची पाहणी करून शेतकऱ्यांना वेळोवेळी ते मार्गदर्शन ते करत असुन त्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल परिसरातील शेतकऱ्यांमधुन त्यांचे अभिनंदन होत आहे.



# निधन वार्ता

### कुंदा नागरे



**शिर्डी :** येथील सराफ व्यापारी दिलीप नागरे यांच्या पत्नी कुंदा दिलीप नागरे (वय ६२) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, चार मुली, सुना, नातवंडे, जावई, दिर असा परिवार आहे. सराफ व्यापारी दिलीप भास्कर नागरे त्या यांच्या पत्नी, तर बाळासाहेब, शांताराम, सुनिल नागरे यांच्या भावजयी व राजेंद्र नागरे यांच्या त्या मातोश्री होत.

### सिताराम घाडगे



**राहुरी :** राहुरी फॅक्टरी येथील जुन्या पिढीतील जेष्ठ नागरिक व सामाजिक कार्यकर्ते सिताराम रंगनाथ घाडगे (वय ८२ वर्ष), यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्याच्या पश्चात पत्नी,दोन मुले,सूना,नातवंडे असा परिवार आहे.ते पत्रकार शिवाजी घाडगे व रंगनाथ घाडगे यांचे वडील होत.

### चंद्रभान बर्डे



**वडाळा महादेव :** राहुरी तालुक्यातील पाथरे खुर्द येथील चंद्रभान सोमा बर्डे (वय ७४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा एक मुली तीन बंधू पुतणे सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे येथील सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर बर्डे, दिपा संजय भगत, अर्चना भालेराव, राही बर्डे यांचे ते वडील तर दत्तात्रेय व बबनराव बर्डे यांचे ते बंधू होत.

### भाऊसाहेब कोळसे



**राहुरी :** राहुरी तालुक्यातील गुहा येथील भाऊसाहेब माणिकराव कोळसे (वय ६०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, आई, पत्नी, मुलगा, मुलगी व पुतणे असा परिवार आहे. ते राजेंद्र व संभाजी कोळसे यांचे थोरले बंधू होत.

# गंगापूरमध्ये उद्या 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे आगमन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** जलसंवर्धन, नदी पुनरुज्जीवन आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाचा संदेश देणारी 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा सोमवारी (दि. २७ एप्रिल) गंगापूर शहरात दाखल होणार असून स्वागतासाठी शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे, अशी माहिती आमदार प्रशांत बंब यांनी दिली.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा २०२६' अंतर्गत आयोजित ही यात्रा राज्यातील विविध नद्यांच्या जलकलशांसह जनजागृती करत प्रवास करत आहे. यात्रेचा शुभारंभ २५ एप्रिल रोजी त्र्यंबकेश्वर मंदिर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला, तर चौंडी येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

चौंडी येथून सुरू झालेली यात्रा अहमदनगर, नाशिक, सिन्नर, निफाड, शिर्डी, कोपरगाव व वैजापूर मार्गे प्रवास करत सोमवारी गंगापूर येथे पोहोचणार आहे. गंगापूरमध्ये स्वागत झाल्यानंतर यात्रा पुढे घृष्णेश्वर मंदिर – वेरूळ येथे मुक्कामी जाणार आहे.

यात्रेत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, गिरीष महाजन, वारकरी, भाविक, सामाजिक कार्यकर्ते व जलप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी होत असून मार्गात धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.गंगापूर शहरात भाजप व जलसंवर्धन प्रेमींकडून स्वागताची जय्यत तयारी सुरू असून पाणी वाचवा, भविष्य वाचवा हा संदेश देणारी ही यात्रा जलसंवर्धनाबाबत व्यापक जनजागृती करणार आहे. यात्रेच्या स्वागतासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

# कत्तलीसाठी जाणाऱ्या गोवंशीय वाहतुकीवर कारवाई, दोघे फरार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शहरातील इस्माईल नगर परिसरात गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करण्यासाठी निर्दयतेने वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत दोन वाहनांसह चार गायी व इतर जनावरे असा एकूण सुमारे २ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणातील दोन संशयित आरोपी घटनास्थळावरून फरार झाले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक २३ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पोलीस कर्मचारी संदीप मुरकुटे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. त्यानुसार इस्माईल नगर येथे तातडीने सापळा रचण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळी धाड टाकली असता दोन छोटा हत्ती टेम्पो (एमएच–१५ ईजी ४२४८ व एमएच–१२ एफडी ०२६६) यामध्ये गोवंश जातीची जनावरे कोंबून ठेवलेली आढळली. पोलिसांची चाहूल लागताच वाहनचालकांनी गाड्या जागीच सोडून पळ काढला. पंचांसमक्ष करण्यात आलेल्या पंचनाम्यात दोन वाहनांसह चार जरशी गायी तसेच परिसरातून आणखी एक गाय, एक नवाट गोरा व एक कालवड असा एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला. यासंदर्भात केलेल्या चौकशीत या वाहनांचे चालक शाहरुख सुलतान कुरेशी व मुक्तार मुश्ताक कुरेशी (दोघेही रा. राहुरी) असल्याचे समोर आले आहे. त्यांच्या विरोधात मोटार वाहन अधिनियम, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम व प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून फरार आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

# जनगणना प्रशिक्षण ३० एप्रिलपासून सुरू

### प्रशिक्षण सकाळ सत्रात करण्यासाठी; शिक्षकांची मागणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** मे २०२६ ते जून २०२६ या कालावधीत होणाऱ्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्याच्या अनुषंगाने ३० एप्रिल ते ६ मे दरम्यान गंगापूर तहसील कार्यालयात प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणामध्ये प्रत्येक प्रगणकाला सुमारे २०० घरांची माहिती प्रत्यक्ष भेटीद्वारे संकलित करावी लागणार असून, सहा प्रगणकांमागे एका पर्यवेक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे. यावर्षी प्रथमच मोबाईल ॲपच्या माध्यमातून जनगणना प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

दरम्यान, उन्हाळ्याच्या तीव्रतेचा विचार करता प्रशिक्षणाचे आयोजन सकाळच्या सत्रात करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेत्तर सेनेच्या वतीने तहसीलदार नवनाथ वागवाड यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तसेच, उन्हाळ्यात प्रत्यक्ष जनगणना कार्य करावे लागणार असल्याने गरोदर माता व दिव्यांग शिक्षकांना या कार्यातून वगळण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. याबाबत तहसीलदार नवनाथ वागवाड यांनी सकारात्मक भूमिका घेत गरोदर माता व दिव्यांग कर्मचाऱ्यांना कार्यातून वगळण्याचे आश्वासन दिले आहे.

याप्रसंगी शिक्षक व शिक्षकेत्तर सेनेचे मराठवाडा उपाध्यक्ष अनिल काळे, जिल्हा सरचिटणीस भगवान हिवाळे, जिल्हा उपाध्यक्ष दिपक साबळे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख उद्धव बोचरे, तालुकाध्यक्ष राजेंद्र बोल्डे, तालुका संपर्कप्रमुख कैलास गायके, तालुका सरचिटणीस सचिन साळुंके, तालुका कार्याध्यक्ष निलेश कहाटे, कोषाध्यक्ष योगेश दांगुर्डे, तालुका प्रसिद्धीप्रमुख जावेद पटेल, हरिश्चंद्र खोसे, विजु तुपे माळीवाडगावकर, बबन शेळके, संतोष पंडीत, भास्कर आढाव तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# राजे शहाजी महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रांवर कॉपी, मान्यता रद्द करण्याची शिफारस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** फेब्रुवारी/मार्च २०२६ मधील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेदरम्यान गंगापूर तालुक्यातील एका परीक्षा केंद्रावर मोठ्या प्रमाणात गैरप्रकार उघडकीस आल्याने शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. संबंधित परीक्षा केंद्राची मान्यता पुढील वर्षापासून कायमस्वरूपी रद्द करण्याची शिफारस करण्यात आली असून या कारवाईमुळे शैक्षणिक वर्तुळात खळबळ उडाली आहे.

जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर (माध्यमिक शिक्षण विभाग) यांनी दिलेल्या अधिकृत पत्रानुसार, गंगापूर तालुक्यातील अंबेलोहळ येथील राजे शहाजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्र क्रमांक ००४५ येथे इयत्ता दहावीच्या इंग्रजी विषयाच्या पेपरदरम्यान गैरप्रकार झाल्याचे स्पष्ट झाले. दि. १० मार्च २०२६ रोजी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती गंगापूर यांनी केंद्राला अचानक भेट दिली असता तब्बल १७ विद्यार्थी कॉपी करताना आढळून आले. या घटनेनंतर तात्काळ संबंधित विद्यार्थ्यांवर कॉपी प्रकरणे नोंदवण्यात आली.

या घटनेची माहिती उच्च अधिकाऱ्यांना देण्यात आली असून शासन निर्णय व परीक्षा नियमनानुसार अशा गैरप्रकारांना कोणतीही माफी नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, शासनाने यापूर्वीच जाहीर केलेल्या निर्देशांनुसार ज्या परीक्षा केंद्रांवर कॉपी किंवा इतर गैरप्रकार आढळतील, त्या केंद्रांची मान्यता पुढील वर्षापासून कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद आहे.

त्याअनुषंगाने, सदर प्रकरण अत्यंत गंभीर स्वरूपाचे मानण्यात आले असून राजे शहाजी कनिष्ठ महाविद्यालय, अंबेलोहळ येथील परीक्षा केंद्र मान्यता रद्द करण्याबाबत शिक्षणाधिकाऱ्यांनी वरिष्ठांकडे शिफारस पाठवली आहे. या निर्णयामुळे संबंधित संस्थेला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता, देखरेख व जबाबदारीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी अधिक कडक उपाययोजना राबविण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

शिक्षण विभागाकडून पुढील आदेशांची प्रतीक्षा असून, या प्रकरणात संबंधित केंद्र प्रशासनावरही जबाबदारी निश्चित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# संभाजी महाराज जयंती उत्सव २०२६ नियोजन बैठक उत्साहात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** दि. २३ एप्रिल २०२६ श्रीगोंदा शहरात होणाऱ्या शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव २०२६ निमित्त पंचायत समिती, श्रीगोंदा येथे जयंती उत्सव समितीची नियोजन बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत केवळ महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करून ती नियोजित वेळेत संपन्न करण्यात आली. बैठकीत झालेल्या चर्चेतील निर्णय सर्व सदस्य व संबंधित संघटनांपर्यंत पोहोचवण्यासाठी वैयक्तिक भेटी, दूरध्वनी तसेच सोशल मीडियावरील गटांद्वारे संपर्क साधण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी जयंती उत्सव १४ व १५ मे २०२६ रोजी दोन दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांद्वारे साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. उत्सवात प्रतिमापूजन, मॅरेथॉन स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, शंभू गौरव गीते, बुधभूषण ग्रंथ पारायण, शंभूप्रसाद, संगीत खुर्ची स्पर्धा, मान्यवरांचा सन्मान तसेच शंभू चरित्र शाहीर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# स्टेडियम,पैसा आणि लक्ष क्रिकेटकडेच

### मग ऑलिंपिक पदके कशी येणार? भारताने क्रीडा समतोल साधण्याची गरज..

भारत हा जगातील सर्वात तरुण देशांपैकी एक आहे.अपार ऊर्जा,नैसर्गिक प्रतिभा आणि जिद्द असलेली तरुणाई आपल्या देशात आहे. तरीदेखील ऑलिंपिक स्पर्धांमध्ये अपेक्षित प्रमाणात पदके मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती आपण नाकारू शकत नाही.हा केवळ खेळाडूंचा प्रश्न नाही, तर संपूर्ण क्रीडा व्यवस्थेचा,धोरणांचा आणि समाजाच्या मानसिकतेचा मुद्दा आहे. क्रिकेटचे वर्चस्व – इतर खेळांवर सावली.भारतात क्रिकेट हा खेळ नसून एक संस्कृती बनली आहे. स्टेडियमपासून ते प्रायोजकांपर्यंत, मीडिया कव्हरेजपासून ते करिअर संधीपर्यंत सर्वत्र क्रिकेटचेच वर्चस्व दिसते. अब्जावधी रुपयांची क्रीडा अर्थव्यवस्था प्रामुख्याने क्रिकेटभोवती फिरते. परिणामी ॲथलेटिक्स, कुस्ती, टेबल टेनिस, जलतरण, जिम्नॅस्टिक्स यांसारख्या ऑलिंपिक खेळांना आवश्यक तेवढा निधी, सुविधा आणि प्रोत्साहन मिळत नाही. यामुळे अनेक गुणी खेळाडू लहान वयातच खेळ सोडतात किंवा योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे मागे पडतात. प्रतिभा असूनही संधींच्या अभावामुळे ती फुलत नाही, ही देशासाठी मोठी हानी आहे.पायाभूत सुविधांची कमतरता आणि चुकीचा वापरआपल्या देशात अनेक ठिकाणी क्रीडांगणे आहेत, पण त्यांचा दर्जा आणि वापर योग्य पद्धतीने होत नाही. अनेक वेळा टेनिस कोर्टवर बॅडमिंटन खेळले जाते किंवा मल्टीपर्पज मैदानांवर कोणत्याही नियोजनाशिवाय विविध खेळ खेळले जातात. यामुळे खेळाडूंना तांत्रिकदृष्ट्या योग्य प्रशिक्षण मिळत नाही. जिल्हा आणि तालुका स्तरावर दर्जेदार सुविधा, प्रशिक्षक आणि उपकरणांची मोठी कमतरता आहे. ग्रामीण भागात तर परिस्थिती आणखी आव्हानात्मक आहे. मानसिकता आणि करिअरची भीती.. भारतात अजूनही खेळ हा करिअर म्हणून पूर्णपणे स्वीकारला गेला नाही. पालक आणि समाज शिक्षणाला प्राधान्य देताना खेळाकडे दुय्यम दृष्टीने पाहतात. खेळून काय मिळणार? हा प्रश्न अजूनही विचारला जातो. ही मानसिकता बदलल्याशिवाय मोठा बदल होणे कठीण आहे. चीनचा आदर्श – फिटनेस ते पदक..चीनसारख्या देशांनी दीर्घकालीन दृष्टीकोन ठेवून काम केले आहे. त्यांनी केवळ ऑलिंपिक मेडल्सवर लक्ष केंद्रित केले नाही, तर संपूर्ण देशासाठी राष्ट्रीय फिटनेस कार्यक्रम राबवला. शाळांपासून ते प्रौढांपर्यंत सर्वांना शारीरिकदृष्ट्या सक्रिय ठेवण्यावर भर दिला.त्याचा परिणाम असा झाला की मोठ्या प्रमाणात फिट लोकसंख्या तयार झाली, ज्यातून उत्कृष्ट खेळाडू घडले. तसेच त्यांची मानसिक ताकद, शिस्त आणि स्पर्धात्मक वृत्तीही वाढली. भारतासाठी उपाययोजना – काय बदलायला हवे? भारताला क्रीडाक्षेत्रात खऱ्या अर्थाने महासत्ता बनायचे असेल, तर काही मूलभूत बदल आवश्यक आहेत: १. राष्ट्रीय फिटनेस मिशन: देशभरात सकस आणि सातत्यपूर्ण फिटनेस संस्कृती निर्माण करणे. प्रत्येक नागरिकाला रोज किमान शारीरिक हालचाल करण्याची सवय लावणे. २. शाळा स्तरावर क्रीडा अनिवार्य करणे: शाळांमध्ये खेळ हा विषय म्हणून नव्हे, तर जीवनशैली म्हणून रुजवणे. प्रशिक्षित कोचेस आणि योग्य सुविधा उपलब्ध करून देणे. ३. सर्व खेळांना समान निधी आणि प्रोत्साहन: क्रिकेटसारखेच इतर खेळांनाही प्रायोजक आणि मीडिया सपोर्ट मिळाला पाहिजे. ४. ग्रामीण भागावर विशेष लक्ष: खऱ्या अर्थाने प्रतिभा ग्रामीण भागात दडलेली आहे. तिथे सुविधा, प्रशिक्षण आणि स्पर्धा उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे. ५. प्रशिक्षक आणि क्रीडा विज्ञान: आधुनिक तंत्रज्ञान, स्पोर्ट्स सायन्स, न्यूट्रिशन आणि मानसिक प्रशिक्षण यांचा वापर वाढवणे. खेळाचे खरे महत्त्व.. खेळ म्हणजे केवळ जिंकणे किंवा हारणे नाही. खेळ माणसाला घडवतो – शिस्त, संयम, आत्मविश्वास, संघभावना आणि संघर्षाची ताकद शिकवतो. खेळामुळे शरीर तंदुरुस्त राहते, मन शांत आणि स्थिर राहते. आपले शरीर आपल्याला सतत सांगत असते – हलत रहा, धावत रहा, मेहनत करा! कारण शरीर हे कष्ट करण्यासाठीच बनले आहे.

**गौरव अरविंद डेंगळे**
**FIVB Level 1 व्हॉलीबॉल प्रशिक्षक , श्रीरामपूर**
**८७९३३२१५१५**

# घोड धरणावरून साकळाई योजनेला तीव्र विरोध

## शेतकऱ्यांचा महामार्गावर रास्ता रोको वाहतुकीचा खोळंबा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** घोड धरणावरून प्रस्तावित साकळाई पाणीपुरवठा योजना विरोधात घोड लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी आज आक्रमक भूमिका घेत नगरदौंड राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रोको आंदोलन छेडले.परिसरात शेकडो शेतकरी एकवटल्याने काही काळ वाहतूक पूर्णतः ठप्प झाली. प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले.

तालुक्याची जीवनदायी असलेल्या घोड धरणातुन साकळाई योजनेसाठी पाणी देण्यास घोड लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी कडाडून विरोध करत महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले होते.

या आंदोलनादरम्यान बोलताना स्मितल (भैय्या) वाबळे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, साकळाई योजना घोड धरणावर न राबवता सांडव्याद्वारे वाहून जाणाऱ्या पाण्यावर राबवावी.

अन्यथा शेतकरी तीव्र आंदोलन उभारतील. टिळक भोस यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधत म्हटले, साकळाई योजनेचे पाप विद्यमान लोकप्रतिनिधींचे आहे. आमच्या हक्काचे पाणी पुणे जिल्ह्यात अडवले आहे; ते प्रथम घोड धरणात आणून द्यावे.असे अनेक आरोप आंदोलनाच्या दरम्यान करण्यात आले या आंदोलनात आंदोलनकर्ते शेतकऱ्यांनी यावेळी मांडलेल्या प्रमुख मागण्या मागण्यांमध्ये घोड धरण हे जुने व मातीचे असल्याने त्यावर अतिरिक्त ताण टाकू नये,कुकडी प्रकल्पातील वरच्या धरणांमुळे घोड लाभक्षेत्रातील पाणी घटले; हक्काचे पाणी प्रथम द्यावे,सध्या तीव्र टंचाई; तिसरे रोटेशन शक्य नसल्याने साकळाई योजना राबवू नये,साकळाई योजना विसापूर धरणावरून राबविण्याचा पर्याय स्वीकारावा,कोकणात वाहून जाणारे पाणी अडवून कुकडी प्रकल्पात समाविष्ट करावे अश्या मागण्यांची परिसर गजबजून निघाला आहे.




### तीव्र आंदोलनाचा इशारा

घोड धरणावरून साकळाई योजना राबविण्याचा निर्णय तात्काळ मागे घेतला नाही, तर पुढील काळात तालुक्यातील घोड लाभक्षेत्रातील सर्व शेतकरी एकत्र येत अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिला.


या आंदोलनात सरपंच प्रमोद शिंदे, श्रीनिवास घाडगे, तुळशीराम रायकर, रामभाऊ रायकर, सुभाष शिंदे, राजेंद्र नागवडे, राहुल जंगले, बापूसाहेब भुजबळ, महेश सूर्यवंशी, राहुल साळवे, अंबादास मांडे, अजय वाबळे, निळकंठ जंगले, गोरख उंडे आदींनी सहभाग घेत शासनावर तीव्र टीका केली.यावेळी मोठ्या पोलीस बंदोबस्तात शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन घोड विभागाचे उपअभियंता ठणके यांना दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश मांडे यांनी केले.

# अनाधिकृत ज्युस सेंटर व फुडव्हॅनमुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका; कारवाईची मागणी

सुरेश पाटील । राष्ट्र सह्याद्री

**शेवगांव :** शहरात उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात अनेक ज्युस सेंटर तसेच फुडव्हॅन सुरू झाले असून, त्यातील काही चालकांनी आवश्यक परवानग्या न घेता व्यवसाय सुरू केल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. काही ठिकाणी केवळ लाल कपडा बांधून, तात्पुरते शेड उभारून अथवा वाहनांवरून खाद्यपदार्थ व ज्युस विक्री केली जात असल्याचे दिसून येत आहे.

स्थानिक व्यापारी वर्षभर रितसर कर, चलन, अन्न सुरक्षा मानक प्राधिकरणाचे परवाने, नोंदणी तसेच इतर नियमांचे पालन करून व्यवसाय करतात. मात्र काही तात्पुरत्या ज्युस सेंटर व फुडव्हॅनमध्ये अशा कोणत्याही नियमांचे पालन होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात



येत आहे. त्यामुळे नियमित कर भरणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे अशा ठिकाणी वापरले जाणारे पाणी, फळे, बर्फ, कच्चा माल, तेल, मसाले तसेच स्वच्छता व्यवस्था यांची कोणतीही तपासणी होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

उन्हाळ्यात थंड पेये, ज्युस व फास्टफुडची मागणी वाढत असल्याने नागरिक मोठ्या प्रमाणात अशा ठिकाणी गर्दी करतात. मात्र अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अलीकडेच विविध ठिकाणी भेसळ व अस्वच्छतेच्या घटना समोर आल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. अशा अनधिकृत व्यवसायांवर प्रशासनाने लक्ष देऊन तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे.

शहरातील अनेक नागरिकांनी याबाबत नगरपरिषद प्रशासनाकडे तक्रारी केल्याचे सांगितले आहे. संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून परवानगी नसलेल्या ज्युस सेंटर व फुडव्हॅनवर कारवाई करावी, तसेच आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता व अन्न सुरक्षा नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी होत आहे.

शहरातील ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा अनधिकृत व्यवसायांवर प्रशासनाने ठोस पाऊल उचलावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# शेवगांव बाजार समितीच्या सचिवांना मुदतवाढ; शेतकऱ्यांकडून प्रश्नचिन्ह




**शेवगांव** अहिल्यानगर जिल्ह्यातील महत्त्वाच्या बाजार समित्यांपैकी एक असलेल्या शेवगांव कृषी उत्पन्न बाजार समितीतील कारभाराबाबत शेतकरी वर्गातून विविध प्रश्न उपस्थित होत असून, विद्यमान सचिवांना दोन वर्षांची मुदतवाढ देण्यात आल्याने चर्चेला उधाण आले आहे. शेतकऱ्यांच्या मूलभूत समस्या प्रलंबित असताना हा निर्णय का घेण्यात आला, याबाबत आता स्पष्ट आणि ठोस स्पष्टीकरण देण्याची मागणी जोर धरत आहे.

शेवगांव बाजार समितीत तालुक्यातील अनेक शेतकरी धान्य व इतर शेतमाल विक्रीसाठी येतात. मात्र, काही व्यापारी हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. परिणामी, शेतमालाला न्याय्य दर मिळतोय का? हा मूलभूत प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर बाजार परिसरात पिण्याचे पाणी, सावली यांसारख्या अत्यावश्यक सुविधांचा अभाव असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढताना दिसत आहे.

शेवगांव ही कांद्याची मोठी बाजारपेठ म्हणून ओळखली जात असली, तरी तालुक्यातील सुमारे ८० टक्के कांदा वांबोरी, घोडेगाव, नगर आदी बाजार समित्यांकडे वळत असल्याची बाब समोर येत आहे. स्थानिक बाजारपेठेऐवजी बाहेरच्या ठिकाणी अधिक खर्च करून शेतकरी जात असल्याची ही परिस्थिती चिंताजनक मानली जात आहे. स्थानिक बाजारपेठेवरील विश्वास का कमी होत आहे? हा प्रश्नही यामुळे उपस्थित होत आहे.

मागील वर्षी झालेल्या पुरामुळे बाजार समितीच्या मालमत्तेचे नुकसान झाले होते. मात्र, त्यानंतर दुरुस्ती व विकासकामांना अपेक्षित गती मिळालेली नसल्याची चर्चा आहे.

# विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी चालू वर्षातील शालेय उपक्रमांच्या आठवणींना उजाळा



सुरेश पाटील । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** आज शैक्षणिक चालू वर्षातील परीक्षेचे पेपर संपले. बौद्धिक क्षमतेनुसार आमचा निकाल देखील १ मे ला लागेल. पण ज्यांच्या सानिध्यात सकाळपासून दुपारपर्यंत राहिलो ते वर्ग सवंगडी, आवडते शिक्षक आता तब्बल दीड महिना मिळणार नाही याची खंत आहे. मोबाईलवर बोलणे, गप्पा देखील होतील मात्र सुख:दुखाची गोष्टी मनाने ओळखणारे या उन्हाळ्याच्या सुट्टीत प्रत्यक्ष दिसणार नाही म्हणत अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या भावना शाळांच्या नांनाकडे व्यक्त केली. निम्मित होते रविशंकर विद्यामंदिराच्या चालू शैक्षणिक वर्षातील आठवणींना उजाळा देण्याचा कार्यक्रम. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विजय सकट होते तर संस्थेचे प्रमुख कार्यवाहक नंदकुमार लांगोरे या आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमास उपस्थित होते.

वास्तविक पाहता परीक्षा संपल्यावर उन्हाळी सुट्टीची चाहूल विद्यार्थ्यांना आनंद देणारी असती. मात्र रविशंकर विद्यामंदिराच्या विद्यार्थ्यांनी आता दीड महिना आपल्या वर्गातील सवंगडी, शिक्षक आणि संस्थेचे विश्वस्त आपल्याला प्रत्यक्ष भेटणार नाही याची खंत अंजली गोडसे, शमा अन्सारी, कार्तिकी देवकाते, शिवानी पठाडे, कार्तिकी जाधव, आरोही पठाडे या विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतामध्ये मांडली.

आता दीड महिना ना अभ्यास, ना गृहपाठ केवळ दंगा आणि मौजमस्ती करायला मिळणार असले तरी विद्यार्थी शाळेला मिस करतायत हे पाहून संस्थेचे प्रमुख नंदकुमार लांगोरे, ज्ञानेश्वर शेटे, भोज मॅडम यांनी विनोद, कविता आणि चुटकुले म्हणत भावुक वातावरण हलके-फुलके केले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी उन्हाळी सुट्टी आनंदाने आणि पालकांच्या मार्गदर्शन व निगराणी खाली मनमुराद आनंद घ्यावा असे आवाहन समारोपाच्या भाषणात विजय सकट यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सविता बळे यांनी तर सुत्रसंचालन संजय मडके यांनी पार पाडले.

# सीस पे नंतर 'समर्थ क्रॉप केअर' घोटाळा उघड

## कोट्यवधी बुडाले, गोरगरीबांची स्वप्ने चिरडली

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : श्रीगोंद्यात सुरवातीला सिस-पे नावाच्या कंपनीचा उदय झाला जास्त परताव्याचे आमिष दाखवत सर्वसामान्यांची लूट करणाऱ्या सिस पे घोटाळ्याने तालुका हादरला तोच पुन्हा 'समर्थ क्रॉप केअर' या कंपनीच्या घोटाळ्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. याआधी सिस्पे प्रकरणात कोट्यवधी गमावलेल्या नागरिकांना सावरण्याची संधी मिळत नाही तोच पुन्हा एकदा मोठ्या आर्थिक फसवणुकीने जनतेचा विश्वास चुरगळला आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील एका राजकीय नेत्याच्या शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून नोकरीस असणाऱ्या शिक्षकाने सिस पे श्रीगोंद्यात आणली आणि शिक्षक नेते यासह पत्रकार पोलीस वकील यासह अनेकांनी यामध्ये कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केली मात्र त्यामध्ये कोट्यवधी रुपयांना तालुका बुडाला त्यातून सावरण्याच्या आगोदर पुन्हा समर्थ क्रॉप केअर नावाची कंपनी उदयास आली हि कंपनी शेतकऱ्याचा शेतमाल विकत घेऊन परदेशात पाठवते आणि त्यातून मिळणारा नफा शेतकऱ्यांना दिला जातो असे सांगितले गेले मात्र त्या कंपनीची जहाजे काही काळातच समुद्रात भरकटली आणि त्यातून तालुक्यात हजारो कोटीची फसवणूक झाली आहे या दोन्ही घोटाळ्यात गोरगरीब नागरिक सर्वाधिक भरडले गेले असून अनेक कुटुंबांची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कटली आहे. काहींचे विवाह पुढे ढकलले गेले, तर काहींची लग्ने मोडली. अनेकांची घरबांधणी अर्धवट राहिली असून कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या नागरिकांना जगणे कठीण झाले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे उपचाराअभावी जीव गमावल्याच्या घटनाही समोर येत आहेत. दरम्यान, गुंतवणुकीसाठी नागरिकांना प्रवृत्त करणारे एजंट काही काळी परदेश दौरे करून लोकांना अभिमानाने सांगायचे कि आम्ही १२ ते १५ देश फिरलो आहे रोज आम्ही लाखो रुपये कमावत आहेत मात्र आता हात झटकून मोकळे झाले आहेत. काही एजंट फरार असून काहींनी मोबाईल बंद करून ठावठिकाणा लपविला आहे. काहीजण वेशांतर करून फिरत असल्याच्या चर्चा रंगत आहेत.

तसेच, काही एजंटांनी आपली मालमत्ता नातेवाईकांच्या नावे हस्तांतरित केल्याची माहिती समोर येत आहे.प्रशासनाची भूमिका मात्र संथ असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गोरगरिबांच्या पैशाला न्याय मिळणार का? असा सवाल उपस्थित केला जात असून संबंधित कंपनीचे संचालक, डायरेक्टर आणि एजंट यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, फसवणुकीतून काही एजंट किवा गुंतवणूकदार अनेकजण मालामाल झाले असले तरी अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. त्यामुळे या प्रकरणात तातडीने ठोस पावले उचलून पीडितांना न्याय देण्याची मागणी सर्व स्तरांतून होत आहे.

पोलिसांच्या कामकाजावर नाराजी व्यक्त

सीस पे फसवणूक प्रकरणात अनेक तक्रारी दाखल झाल्यावर तो गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे हस्तातर करण्यात आला त्यानंतर काहीना अटक करण्यात आली ते जामिनावर बाहेर आहेत मात्र अजूनही संचालक यासह दलाल अजूनही मोकाट फिरत आहेत त्याच्या मालमत्तेवर टाच आणल्याचे बोलले जाते मात्र सगळे व्यवहार सुरळीत असल्याचे गुंतवणूकदार सांगत आहेत त्यामुळे समर्थ क्रॉप केअर चे काय होणार ?मात्र सीस पे मध्ये आर्थिक गुन्हे शाखेच्या कामकाजावर मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली जात आहे

## शिवाजी महाराजांच्या अपमानप्रकरणी

# संजय गायकवाड यांची आमदारकी रद्दची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या संदर्भात आक्षेपार्ह, अश्लील वक्तव्य करुन प्रशांत आंबी यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या आरोपावरून त्यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी तसेच त्यांचा आमदारकीचा राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन डिवायएसपी दिलीप टिपरसे यांना देण्यात आले असून, त्यांच्या मार्फत गृहमंत्री तसेच मुख्यमंत्री यांनाही निवेदन पाठविण्यात आले आहे. तसेच या संदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन त्यांना शिवाजी कोण होता? या पुस्तकाची भेट देण्यात आली. यावेळी पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे सामुदायिक वाचन करून गायकवाड यांचा निषेध व्यक्त करण्यात आला.



या आंदोलनात राज्य सेक्रेटरी कॉ. ॲड सुभाष लांडे, ॲड सुधीर टोकेकर, इंजि. प्रशांत पाटिल, संध्या मेढे, भैरवनाथ वाकळे, भारती न्यालपेल्ली, संगीता कोंडा, संजय वाघ, कॉ. फिरोज शेख, संजय झिंजे, अशोक सुर्यवंशी, कॉ. सुभाष कडलग, सुदाम लगड, विनायक गोरखे, राजु वैराळ, अनिल भोसले (भाकप माले राज्य सदस्य), प्रा. डॉ. महेबुब सय्यद, सोमनाथ केंजळे, युनुस तांबटकर, प्रविण सोनवणे, ड विद्या जाधव, दुर्गेश भोसले, आर्कि. अर्शद शेख, कॉ. अविनाश साठे, बापु चंदनशिवे, राजेंद्र कर्डिले, श्याम शिंदे, दिपक शिरसाठ, बापूराव राशिनकर, संदीप इथापे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, आमदार संजय गायकवाड यांनी बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ रोजी रात्री १२.५२ वाजता ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनचे माजी राज्य सेक्रेटरी प्रशांत आंबी यांना फोनवरून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या संदर्भात अत्यंत अश्लील व आक्षेपार्ह भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही बाब लोकशाही मूल्ये व अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बाधा आणणारी असल्याचे भाकपने स्पष्ट केले आहे.

यासोबतच छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल त्यांनी अवमानकारक वक्तव्य करून महाराष्ट्राच्या श्रद्धास्थानाचा अपमान केल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. आमदार गायकवाड यांचे वर्तन हे आमदार पदाला शोभणारे नसून राज्याच्या राजकीय संस्कृतीला कलंक लावणारे असल्याची टीका करण्यात आली. शिवाजी कोण होता? हे पुस्तक इतिहासाचा चिकित्सक व अभ्यासपूर्ण दृष्टिकोन मांडणारे असल्याचे नमूद करण्यात आले आहे. समाजात वैज्ञानिक दृष्टी, समता आणि ऐतिहासिक सत्य जाणून घेण्याची प्रेरणा देणारे हे महत्त्वपूर्ण लेखन असल्याचे सांगण्यात आले. तसेच प्रबोधनकार ठाकरे यांनी १९२६ मध्ये दगलबाज शिवाजी हे पुस्तक लिहिले होते, तर गणेश कुऱ्हाडे यांनी १९३९ मध्ये शिवाजी कोण होता? हे पुस्तक लिहिल्याचा उल्लेखही करण्यात आला.

## द·ख·ल



### ख्रिश्चन सेल जिल्हाध्यक्षपदी सतीश क्षेत्रे

**करंजी** : राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद चंद्र पवार गट ख्रिश्चन सेलच्या जिल्हाध्यक्षपदी सतीश क्षेत्रे यांची नुकतीच निवड करण्यात आली. कायनेटिक चौक अहिल्यानगर येथील कार्यालयामध्ये पार पडलेल्या या निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे यांनी दिले. यावेळी खासदार निलेश लंके, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे ,बिशप पाडळे. रेव्ह .जे.डी वाघमारे, रेव्ह. मिसाळ यांच्या उपस्थितीमध्ये हि निवड करण्यात आली.

ख्रिश्चन समाजावर होणारे अन्याय अत्याचार धर्मगुरू वर होणारे हल्ले. ख्रिश्चन समाजाला आवश्यक असलेली स्मशानभूमी तसेच ख्रिश्चन समाजाला विविध क्षेत्रात प्रतिनिधीत्व मिळवून देणे तसेच वेगवेगळे प्रश्न या सेलच्या माध्यमातून सोडवण्याची जबाबदारी जिल्हाध्यक्षावर देण्यात आली आहे.यावेळी सेलचे उपाध्यक्ष योगेश बारसे,खजिनदार आकाश क्षेत्रे, सरचिटणीस अरविंद पवार, संघटक सचिव संदीप आरोळे यांची निवड जाहीर करण्यात आली.

यावेळी बोलताना नुतन जिल्हाअध्यक्ष सतिश क्षेत्रे म्हणाले की ख्रिश्चन समाजाला न्याय देण्यासाठी तसेच राजकीय प्रवाहात आणण्यासाठी मी माझ्या परीने प्रयत्न करील तसेच ख्रिश्चन समाजावर ज्या ज्या वेळी अन्याय होईल त्यावेळी अन्यायाला वाचा फोडण्याचा काम मोठ्या जबाबदारीने करणार असल्याचे क्षेत्रे यांनी सांगितले. या कार्यक्रमास छगनराव क्षेत्रे, भाऊसाहेब क्षेत्रे, सखाराम क्षेत्रे, राजू क्षेत्रे, बाबासाहेब क्षेत्रे, युवराज क्षेत्रे, झुंबरराव क्षेत्रे, दीपक क्षेत्रे, दिनेश क्षेत्रे, सिमोन क्षेत्रे,बारकु क्षेत्रे आदि उपस्थित होते. सतीश क्षेत्रे यांच्या निवड बद्दल माजी आमदार प्राजक्त तनपुरे, शिवशंकर राजळे, जालिंदर वामन आदिनी अभिनंदन केले आहे.

### जालिंदर बोरुडे यांचा शहर सहकारी बँकेत सत्कार



**अहिल्यानगर** : सामाजिक कार्यकर्ते तथा 'नेत्रदूत' श्री जालिंदर बोरुडे यांना कोल्हापूर येथील सत्यशोधक प्रागतीक निर्मिती विचार मंचच्या वतीने महात्मा फुले राष्ट्रीय सन्मान पुरस्कार तसेच बौध्द संस्कार संघाच्या वतीने समाजभूषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल शहर सहकारी बँकेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. बँकेचे व्हाईस चेअरमन प्रा. माणिक विधाते आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लेंखडे यांच्या हस्ते जालिंदर बोरुडे यांचा सत्कार करण्यात आला. आले. उद्योजक वैभव बोरुडे, मखरे, विवेक गायकवाड, आनंद मोकाटे आदी मान्यवर उपस्थित होते.

### सन फार्मा विद्यालयात आरएसपी विद्यार्थ्यांना अग्निशमनाचे प्रशिक्षण

**अहिल्यानगर** : महाराष्ट्र राज्य पोलीस गृह विभाग आणि शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक सुरक्षा आणि नागरी संरक्षण या विषयांतर्गत नागापूर येथील सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आर.एस.पी. (राष्ट्र विद्यार्थी पोलिस) विद्यार्थ्यांसाठी विशेष अग्निशमन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आग विझविण्याचे प्रत्यक्ष धडे देत आपत्कालीन परिस्थितीत कसे वागावे याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. आजच्या धकाधकीच्या जीवनात वाढते तापमान आणि बदलते वातावरण यामुळे विविध प्रकारच्या आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सध्या ३८ ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचणाऱ्या तापमानामुळे इलेक्ट्रिक वाहनांना आग लागणे, माळरान व डोंगर पेट घेणे, घरगुती विजेच्या शॉर्टसर्किटमुळे किंवा गॅस गळतीमुळे लागणाऱ्या आगी अशा घटना वाढल्या आहेत. या प्रात्यक्षिकामध्ये अग्निशामक दलाचे कर्मचारी शिवदास वांढेकर, सुरज पोकळे, भारत पाडगे, सिद्धार्थ खरात, मयूर लांडगे, अमोल ढमाले, आतेष भापकर, प्रभात साठे आणि नागनाथ नाईक यांनी सक्रिय सहभाग घेत आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजना प्रत्यक्ष करून दाखवल्या. विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त टाळ्यांच्या गजरात या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

### अनुराधा मिश्रा यांची सुवर्ण कामगिरी

**अहिल्यानगर** : शहरातील अनुराधा रत्नेश मिश्रा यांनी लासलगाव (जि. नाशिक) येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दमदार कामगिरी करत तीन सुवर्ण पदकांची कमाई केली आहे. पॉवरलिफ्टिंग, बेंच प्रेस आणि डेडलिफ्ट या तिन्ही प्रकारांत त्यांनी अव्वल स्थान पटकावत जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे. अनुराधा मिश्रा यांनी यापूर्वीही आशियाई पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय यश मिळवले होते. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे आणि जिद्दीमुळे त्यांनी राज्य पातळीवरही आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. या स्पर्धेत बेंच प्रेस प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत अनुराधा मिश्रा यांनी 'स्ट्रॉंग वुमन ऑफ महाराष्ट्र २०२६' ही मानाची ट्रॉफीही पटकावली. अत्यंत चुरशीच्या आणि काट्याच्या स्पर्धेत त्यांनी तब्बल ३५० किलोपर्यंत वजन उचलत आपले शारीरिक सामर्थ्य आणि तांत्रिक कौशल्य सिद्ध केले.

## द•ख•ल

### शालेय विद्यार्थ्यांचा बुडवून मृत्यू



**अवसरी बुद्रुक :** आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक येथे चौथीत शिकणाऱ्या कृष्णा प्रशांत चवरे या शालेय विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला दिनांक २२ एप्रिल रोजी दुपारी एक वाचण्याच्या सुमारास मंचर शिरूर रोड जवळ हिंगे वस्ती जवळ ही घटना घडली. या घटनेमुळे परिसरात आणि गावात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार कृष्णाचे वडील प्रशांत चवरे हे आपल्या शेतात पाणी भरण्याचे काम करत होते. कृष्णा आपल्या मित्रांबरोबर पोहायला गेला होता. खोल पाण्याचा अंदाज न आल्याने कृष्णा पाण्यात बुडू लागला ही गोष्ट मित्रांच्या लक्षात आल्याने मित्रांनी आरडा ओरडा करून ही घटना स्थानिक नागरिकांना सांगितली नागरिकांनी पाण्यात उतरून कृष्णाला पाण्याच्या बाहेर काढले. आणि मंचर येथील जिल्हा रुग्णालय येथे दाखल केले डॉक्टरांनी तपासून कृष्णाला मृत घोषित केले. या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला ाहे. दरम्यान स्थानिक नागरिकांनी सांगितले आहे की ठिकठिकाणी मुरूम उपसा करून मोठमोठे खड्डे निर्माण केले आहे या खड्ड्यांमुळेच कृष्णाचा मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. यावर प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे. या घटनेचा तपास मंचर पोलीस स्टेशन करत आहे.

### हातभट्टी दारू जप्त आरोपी फरार एकावर गुन्हा दाखल

**कवठे येमाई :-** शिरूर तालुक्यातील चांडोह गावच्या हद्दीत हातभट्टी दारू विक्रीप्रकरणी पोलिसांनी कारवाई करत साठा जप्त केला असून आरोपी फरार झाला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, २४ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे साडेसात वाजता लाखनगाव पुलाजवळील काटवण परिसरात पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. यावेळी भानुदास शिवराम गाडगे (रा. निमगाव सावा, ता. जुन्नर) हा इसम ६० लिटर हातभट्टीची तयार दारू (किंमत अंदाजे ३००० रुपये) विक्रीसाठी बाळगत असल्याचे आढळले. मात्र पोलिसांची चाहूल लागताच आरोपी घटनास्थळावरून पळून गेला.पोलिसांनी दारूचा साठा जप्त केला असून याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात मुंबई प्रोहिबिशन कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा रजिस्टर क्रमांक ३६०/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तर दुसऱ्या घटनेत चांडोह गावात बेकायदा दारू साठा बाळगल्याप्रकरणी पोलिसांनी कारवाई करत एका इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २४ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे साडेसात वाजण्याच्या सुमारास चांडोह येथील आप्पाची खानावळ हॉटेलच्या शेजारी आरोपी देविदास उर्फ रामदास नानाभाऊ शिंदे (वय ४२, रा. चांडोह) याच्याकडे देशी-विदेशी दारूचा साठा बेकायदेशीर विक्रीसाठी ठेवलेला आढळून आला. पोलिसांनी छापा टाकून सुमारे १९ हजार रुपयांचा विविध कंपन्यांच्या दारूचा साठा जप्त केला.याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात मुंबई प्रोहिबिशन कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहे

### टाकळी हाजी येथे जमिनीच्या वादातून मारहाण तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**कवठे येमाई :-** शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी (गावडे मळा) येथे जमिनीच्या वादातून मारहाणीची घटना घडली असून याप्रकरणी तिघांविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी ओंकार बाळू गावडे (वय २२, रा. टाकळी हाजी) हे २३ एप्रिल रोजी सकाळी आपल्या कुटुंबासह जुने घर पाडून साहित्य काढण्यासाठी गेले असता आरोपी सुजित रमेश गावडे,अमित महादू गावडे व सुमित रमेश गावडे यांनी त्यांना अडवले. यावेळी वाद होऊन सुजित गावडे यांनी फिर्यादीला ट्रॅक्टरवरून खाली ओढले, तर सुमित गावडे यांनी लाकडी काठीने डोक्यात मारहाण केली. फिर्यादीच्या मदतीसाठी आलेल्या आई-वडील व भावालाही आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली, असे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी शिरूर पोलीस स्टेशन येथे विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शिरूर पोलीस करत आहेत.

### शिरूरला निर्माण प्लाझा येथे रस्त्यातच महिलेची प्रसूती

**कवठे येमाई :-** शिरूर येथील निर्माण प्लाझा परिसरात एका गरोदर महिलेची रस्त्यातच प्रसूती होण्याची घटना आज घडली. कड उन्हात महिलेला प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर महिला रस्त्यातच बसली आणि काही वेळातच तिने गोंडस बाळाला जन्म दिला. नगरसेविका डॉ.सुनिता पोटे व उपस्थित महिलांकडून तत्परतेने या महिलेस योग्य ती मदत मिळाल्याने माणुसकीचे दर्शन पहावयास मिळाले. त्या गरोदर महिलेची अवस्था व तिला होत असलेल्या वेदना पाहून परिसरातील महिलांनी तत्काळ धाव घेत साड्या व स्कार्फ च्या मदतीने रस्त्यावरच बसलेल्या त्या महिले भोवती सुरक्षित वातावरण तयार केले.या परिस्थितीची माहिती मिळताच नगरसेविका डॉ. सुनिता पोटे,नगरसेविका पूजा पोटावळे आणि पत्रकार सुदर्शन दरेकर घटनास्थळी पोहोचले. डॉ. पोटे यांनी आवश्यक वैद्यकीय मदत करून लगेचच नवजात बाळाला सुरक्षित केले.त्यानंतर आई व बाळाला मिरा नर्सिंग होम येथे हलविण्यात आले असून दोघांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती देण्यात आली. या घटनेत नागरिक, महिलांबरोबर रिक्षाचालक व मेडिकल व्यावसायिकांनीही मदत करून माणुसकीचे मोठे दर्शन घडवले.

### तनिष्क सृष्टीसमोरील धोकादायक भागाला सुरक्षा जाळी

**आळंदी :** चऱ्होली येथील तनिष्क सृष्टीसमोरील रस्त्यालगत सुरक्षा जाळी नसल्यामुळे परिसरात अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला होता. भरधाव वेगाने धावणारी वाहने आणि सततची रहदारी यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला होता. या पार्श्वभूमीवर स्थानिक ग्रामस्थ व चऱ्होली ग्रामपंचायतीने ही बाब आळंदी नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली.या समस्येची गांभीर्याने दखल घेत नगराध्यक्ष कुऱ्हाडे यांनी तत्काळ पावले उचलत संबंधित ठिकाणी सुरक्षा जाळी बसवून घेतली. विशेष म्हणजे, नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत त्यांनी ही कामगिरी स्वखर्चातून पूर्ण केल्याने परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे अपघाताची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होणार असून पादचारी व वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत नगराध्यक्षांचे आभार मानले. नागरिकांची सुरक्षितता हीच आमची प्राथमिक जबाबदारी आहे. कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. स्थानिकांच्या सूचनेनुसार तत्काळ निर्णय घेत हा प्रश्न सोडविण्यात आला. भविष्यातही अशा मूलभूत सुविधांबाबत तडजोड केली जाणार नाही, असे प्रतिपादन नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे पाटील यांनी केले.



# मुळशी धरण परिसरात नवीन प्रवासी लाँच सेवा सुरू

## नागरिकांच्या दळणवळणाला नवे बळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

''**नाझरे सुपे :** मुळशी धरणाच्या बॅकवॉटर परिसरातील नागरिकांच्या दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणारी नवीन प्रवासी लाँच सेवा शनिवारी उत्साहात सुरू करण्यात आली. जिल्हा परिषद पुणेचे अध्यक्ष विरधवल जगदाळे यांच्या हस्ते आणि आमदार शंकरभाऊ मांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली या सेवेचा शुभारंभ झाला.

मुळशी तालुक्यातील वाघवाडी, वडगाव, मोहरी, शिरगाव, वांद्रे, लिंबारवाडी, सुसाळे, पोमगाव, कुंभेरी आणि बार्पे या गावांतील नागरिकांना अनेक वर्षांपासून प्रवासासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. माले मार्गे प्रवास करण्यासाठी सुमारे ४० किलोमीटर अंतर पार करावे लागे आणि त्यासाठी दीड ते दोन तासांचा वेळ लागत होता. यामुळे विद्यार्थी, शेतकरी आणि महिलांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत होते.

पूर्वी सुरू असलेल्या लाँच सेवेमुळे हा प्रवास केवळ १५ मिनिटांत पूर्ण होत होता. मात्र, लाँच नादुरुस्त झाल्यानंतर ही सेवा बंद पडली आणि नागरिकांचे हाल सुरू झाले. स्थानिक ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर प्रशासनाने या प्रश्नाची दखल घेत नवीन लाँच खरेदीस मंजुरी दिली.

राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून आणि विद्यमान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही सेवा सुरू करण्यात आली. आमदार शंकर मांडेकर यांच्या पाठपुराव्यामुळे हा प्रकल्प पूर्णत्वास गेला, असे मान्यवरांनी यावेळी सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, नवीन लाँच आधुनिक व सुरक्षित सुविधांनी सुसज्ज आहे. प्रशिक्षित चालक, लाईफ जॅकेट, आवश्यक सुरक्षा साधने आणि नियोजित वेळापत्रक यामुळे प्रवास अधिक सुरक्षित व सोयीस्कर होणार आहे. विद्यार्थ्यांना वेळेत शाळेत पोहोचणे, शेतकऱ्यांना बाजारपेठेत जाणे आणि महिलांना सुरक्षित प्रवास मिळणे आता शक्य होईल. तसेच, आजारी नागरिकांना तातडीने उपचारासाठी पोहोचणे सुलभ होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास आमदार शंकर मांडेकर, जिल्हा परिषद पुणेचे अध्यक्ष विरधवल जगदाळे, उपाध्यक्ष विवेक वळसे-पाटील, विषय समिती सभापती अमोल नलावडे, सदस्य मिलींद वाळूंज, शांताराम इंगवले, शिवाजीराव बुचडे, मंदा शेळके, पंचायत समिती मुळशीचे सभापती व सदस्य, तसेच स्थानिक पदाधिकारी, सरपंच, ग्रामस्थ, युवक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुळशी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी रस्ते, पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य, पर्यटन आणि रोजगार या क्षेत्रांत सुरू असलेल्या कामांना या नव्या लाँच सेवेची जोड मिळणार आहे. भविष्यातही विकासाची गती कायम ठेवण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



मुळशी धरण परिसरात नवीन प्रवासी लाँच सेवेच्या शुभारंभ प्रसंगी आमदार शंकरभाऊ मांडेकर व मान्यवरांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करतानाचा क्षण.

## पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कामगिरी

### दोन टोळ्यांचा पर्दाफाश, २३ गुन्हे उघडकीस

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वळती, आंबेगाव :** पुणे ग्रामीण पोलीसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने जबरी चोरी, चेन स्नॅचिंग, घरफोडी आणि चोरीच्या गुन्ह्यांमध्ये मोठी कामगिरी करत दोन सराईत टोळ्यांचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एकूण २३ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून सुमारे ४६ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पुणे ग्रामीण जिल्ह्यात २०२५-२०२६ या कालावधीत वाढलेल्या गुन्ह्यांचा आढावा घेत पोलीस अधीक्षकांनी रेकॉर्डवरील सराईत आरोपींवर लक्ष केंद्रीत करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने तीन स्वतंत्र तपास पथके नियुक्त करून सखोल तपास सुरू केला.

तपासादरम्यान घटनास्थळांची पाहणी, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी तसेच फिर्यादी व साक्षीदारांकडून माहिती संकलित करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे मंचर परिसरातील हर्षल दत्तात्रय तांदळे (वय २५) आणि महेश दत्तात्रय मंगळवेढेकर (वय २५) यांना १६ एप्रिल २०२६ रोजी पारगाव हद्दीतून ताब्यात घेण्यात आले.




चौकशीदरम्यान या आरोपींनी अनेक घरफोडी व चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून सुमारे २० तोळे सोन्याचे दागिने, एक पल्सर मोटारसायकल व इतर साहित्य असा एकूण २९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

त्यानंतर चेन स्नॅचिंग व जबरी चोरीच्या तपासात पियुष विरम नानावत (वय १९, रा. कामशेत) याला अटक करण्यात आली. त्याने दोन अल्पवयीन साथीदारांच्या मदतीने अनेक गुन्हे केल्याचे उघड झाले. या प्रकरणात सुमारे १२ तोळे सोन्याचे दागिने व मोटारसायकल असा १७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपी हर्षल तांदळे याच्यावर यापूर्वी विविध पोलीस ठाण्यांमध्ये घरफोडी व चोरीचे ७ गुन्हे दाखल असून त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती. तसेच त्याला जानेवारी २०२६ मध्ये पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते. महेश मंगळवेढेकर याच्यावरही दरोडा व चोरीचे गुन्हे दाखल आहेत. पियुष नानावत हा देखील पूर्वी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला आरोपी असून तो काही महिन्यांपूर्वीच बालसुधारगृहातून बाहेर आला होता.

ही संपूर्ण कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली असून या कामगिरीमुळे पुणे ग्रामीण भागातील वाढत्या चोरीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार आहे.

## जुन्नर-ओतूर रस्त्यावर हायवा व होंडा सिटीची समोरासमोर धडक

### नायब तहसीलदारासह दोघे जण गंभीर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** पांगरी माथा (ता. जुन्नर )गावाजवळ आज दुपारी अंदाजे २:३०च्या सुमारास हायवा व कारची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. यात जुन्नरचे निवडणूक नायब तहसीलदारांसह दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत.

एम एच १४ के. क्यू ०८१२ क्रमांकाचा हायवा जुन्नरहून ओतूरकडे येत होता, तर एम एच १२ एफ. एफ.६४२३ क्रमांकाची कार ओतूरहून जुन्नरकडे जात असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या अपघातात जुन्नर चे नायब तहसीलदार अनंता बनाजी गवारी, वय वर्ष ५२, विजय खारतोडे वय वर्ष ४८, आणि तुषार भीमराव कोरडे वय वर्ष ३५ सर्व रा. जुन्नर, हे जखमी झाले. गवारी व खारतोडे यांची प्रकृती चिंताजनक असून कोरडे यांना किरकोळ दुखापत झाली आहे. तिघांवर निरामय हॉस्पिटल, ओतूर येथे उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे, पोलीस हवलदार नामदेव बांबळे, किशोर बर्डे, ट्रॅफिक वार्डन शुभम काशीद व अमोल मडके यांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली. अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. या अपघाताचा पुढील तपास ओतूर पोलीस करत आहेत.




## रस्त्याच्या मधोमध जाहिरातींच्या कमानी; अपघातांना निमंत्रण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** | संगमनेर शहरातील नाशिक-पुणे मार्गावर रस्त्याच्या मधोमध उभारण्यात आलेल्या जाहिरातींच्या कमानींमुळे अपघातांचा धोका वाढला असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. जलसंपदा विभागाच्या वतीने विविध ठिकाणी उभारलेल्या या कमानींमुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या कमानी रस्त्याच्या मध्यभागी उभारण्यात आल्याने वाहनचालकांना मार्ग काढताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः शनिवारच्या बाजाराच्या दिवशी शहरात मोठी गर्दी असताना या कमानी धोकादायक ठरत आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला तसेच बाहेरून येणाऱ्या नागरिकांना यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी किरकोळ अपघात झाल्याची माहितीही समोर आली आहे.



जलसंपदा विभाग हा सिव्हिल अभियांत्रिकीशी संबंधित असून पाणी नियोजन आणि विकासकामांवर भर देणे अपेक्षित आहे. मात्र, अशा प्रकारे जाहिरातींच्या कमानी उभारल्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षेचा विचार करून तातडीने या कमानी हटवाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. रस्त्याच्या मधोमध उभारलेल्या या कमानींमुळे अपघातांना आमंत्रण मिळत आहे. सार्वजनिक निधीचा अशा प्रकारे वापर करणे योग्य नाही, अशी प्रतिक्रिया छात्र भारतीचे प्रदेशाध्यक्ष अनिकेत घुले यांनी व्यक्त केली.

शहरातील विविध सामाजिक संघटनांनीही या प्रकाराचा निषेध नोंदविला असून तरुणाईमध्येही संतापाचे वातावरण आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने त्वरित योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी सर्व स्तरांतून केली जात आहे.

## शिरूरमध्ये एम.डी. ड्रग्ससह तिघांना अटक

### २१.५२ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण व शिरूर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त कारवाईत अंमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. १७ एप्रिल २६ रोजी पहाटे सुमारे दीड वाजता शिरूरच्या बाबुरावनगर ते न्हावरे (कानिफनाथ) फाटा रोड परिसरात ही कारवाई करण्यात आली.

या प्रकरणी विशाल मारुती मोरे (वय २०, रा. बाफनामळा, शिरूर), प्रतीक संतोष लंघे (वय २५, रा. करडे, ता. शिरूर) आणि मिथुन विजयपाल सिंग (वय २६, रा. रामलिंग रोड, शिरूर) या तिघांना अटक करण्यात आली आहे.शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींकडून एकूण ४७.६० ग्रॅम मॅफेड्रोन (एम.डी.) हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असून त्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे ९ लाख ५२ हजार रुपये आहे. याशिवाय दोन चारचाकी वाहने (वॅगनार व वेरना) आणि इतर साहित्य असा एकूण २१ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

ही कारवाई पाटील वॉशिंग सेंटरजवळ, शिवसाईलिला मंगल कार्यालयासमोर कच्च्या रस्त्याच्या कडेला करण्यात आली. आरोपी हे अंमली पदार्थ विक्रीसाठी बेकायदेशीररीत्या बाळगत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.या प्रकरणी पोलीस हवालदार तुषार अशोककुमार पंदारे यांनी फिर्याद दिली असून शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर नंबर ३३५/२०२६ अन्वये एन.डी. पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २१ (ब) तसेच भारतीय न्यास संहिता कलम ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत पोलीस हवालदार आगलावे यांनी दाखल अंमलदार म्हणून काम पाहिले असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चव्हाण करीत आहेत. प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.

## माहूर विद्यालयाचा गुणवत्तेत डंका जिल्ह्यात द्वितीय, पुरंदर तालुक्यात अव्वल

### गुणवत्ता संवर्धन अभियानात सर्व निकषांवर उत्कृष्ट कामगिरी; मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

''**सासवड :** पुरंदर तालुक्यात राबविण्यात आलेल्या शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानात माहूर माध्यमिक विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत तालुक्यात प्रथम तर जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवला आहे. या यशामुळे विद्यालयासह परिसरात समाधान व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, अध्यापन पद्धतीतील नवोपक्रम, उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि एकूण शैक्षणिक वातावरण या निकषांवर तालुक्यातील विविध शाळांचे मूल्यांकन करण्यात आले. या सर्वच बाबींमध्ये माहूर विद्यालयाने सातत्यपूर्ण व दर्जेदार कामगिरी करत अव्वल स्थान पटकावले.

विद्यालयाच्या यशामागे मुख्याध्यापक श्री. हनुमंत पवार यांचे सक्षम नेतृत्व, शिक्षकांचा सातत्यपूर्ण परिश्रम, विद्यार्थ्यांची जिद्द आणि पालकांचा सक्रिय सहभाग हे प्रमुख घटक ठरले. शाळेत राबविण्यात आलेल्या विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांमुळे गुणवत्तावाढीस चालना मिळाली.




गणेश कला क्रीडा रंगमंच, स्वारगेट येथे आयोजित शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानाच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात माहूर माध्यमिक विद्यालयाला सन्मानित करताना शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, शिक्षण संचालक मा. महेश पालकर, उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, प्राचार्य नंदकुमार सागर, अध्यक्ष प्रसाद गायकवाड, सचिव शिवाजी कामथे, तसेच मुख्याध्यापक हनुमंत पवार व इतर शिक्षक उपस्थित.

गुणवत्ता संवर्धन अभियानाचा समारोप सोहळा पुणे येथील गणेश कला क्रीडा रंगमंच, स्वारगेट येथे दिमाखात पार पडला. कार्यक्रमाचे नियोजन बोरसे सर यांनी प्रभावीपणे केले होते.

या प्रसंगी पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, शिक्षण संचालक महेश पालकर, उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव तथा राष्ट्रपती पुरस्कार विजेते प्राचार्य नंदकुमार सागर, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड, सचिव शिवाजी कामथे, तसेच पदाधिकारी कुंडलिक मेमाणे व सुधाकर जगदाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय जिल्ह्यातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या भाषणातून शिक्षणातील गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मूलभूत संकल्पना दृढ करण्यावर भर द्यावा, असे मत व्यक्त केले. तसेच बदलत्या शैक्षणिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शिक्षकांनी सज्ज राहण्याचे आवाहन करण्यात आले.

माहूर विद्यालयाच्या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आनंदी जगताप, सचिव. आमदार संजय जगताप, मार्गदर्शक तथा सनदी अधिकारी बापुसाहेब जगताप, संस्थापक-सचिव डॉ. एम. एस. जाधव, सहसचिव डी. एन. गवळी, व्यवस्थापक कानिफनाथ आमराळे व रविंद्र जगताप यांनी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

माहूर विद्यालयाच्या या यशामुळे तालुक्यातील इतर शाळांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज अधोरेखित करणारे हे यश असून, भविष्यातही उत्कृष्ट कामगिरी कायम ठेवण्याचा निर्धार विद्यालयाने व्यक्त केला आहे.

## द•ख•ल

### राज्यस्तरीय मंथन परीक्षेत ऋग्वेद करंजकर तालुक्यात प्रथम



**श्रीगोंदा** : राज्यस्तरीय 'मंथन' सामान्य ज्ञान परीक्षेत श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी क्रुग्वेद अरुण कारंजकर याने ३०० पैकी तब्बल २२० गुण मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. जिल्हास्तरावरही ३५वा क्रमांक मिळवला आहे.

क्रुग्वेद हा येथील ज्येष्ठ नागरिक सुनील कारंजकर यांचा नातू असून त्याचे वडील साकेत कारंजकर हे शिरगाव (जि. पुणे) येथील आदर्श प्रकाश देवळे माध्यमिक विद्यालयात कार्यरत आहेत. शैक्षणिक वातावरणाची मजबूत पायाभरणी आणि सातत्यपूर्ण परिश्रम यामुळेच हे यश शक्य झाल्याचे मानले जात आहे.

या यशामागे शाळेचे प्राचार्य दिलीप भुजबळ, वर्गशिक्षिका सौ. चेताली शेडगे (राऊत), तसेच श्री काडे सर आणि सौ. आशा उंडे यांचे मार्गदर्शन लाभले. क्रुग्वेदच्या या कामगिरीबद्दल माजी मंत्री बबनराव पाचपुते, बाबासाहेब भोस, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय निरीक्षक नवनाथ बोडखे, काकासाहेब वांजळकर, कुंडलिकराव देरेकर, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष दत्तात्रय पाचपुते, जिल्हा सचिव पीटर राणसिंग, राम दास ठाकर आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.

### भोसरी येथे संत सेना महाराज जयंती साजरी



**भाळवणी** : संत सेना महाराज मंदिर भोसरी येथे नुकतीच संत सेना महाराज जयंती साजरी करण्यात आली. भोसरी येथील संत सेना महाराज मंदिरात भक्तीमय वातावरणात संत सेना महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी मंदिर परिसरात दिवे प्रज्वलित करून रांगोळी काढण्यात आली. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने आणि भक्ती भावाने दिवे लावून परिसर उजळून टाकला होता. त्यानंतर सर्वांनी एकत्र येत सेना महाराजांची आरती केली. यावेळी संत सेना महाराज मंदिर भोसरी महिला मंडळ अध्यक्ष स्नेहा निलेश गायकवाड, स्थानिक नागरिक, विश्वस्त मंडळ, महिला मंडळाचा मोठा सहभाग होता. आरती नंतर प्रसादाचे वितरण करण्यात आले. संत सेना महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

### अहिल्यानगर तालुक्यातील जलस्रोतांच्या दुरुस्तीची मागणी

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर तालुक्यात चालू वर्षात झालेल्या अतिवृष्टीमुळे नद्या, तलाव आणि बंधाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत सदस्य तथा खेडेगाव विकास संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री. बाबासाहेब सहादू धीवर यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. या निवेदनात तालुक्यातील जलस्रोतांची स्थिती सुधारण्यासाठी खोलीकरण व दुरुस्तीची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. हे निवेदन कार्यालयीन प्रतिनिधी सुरेश फंड यांनी स्वीकारले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अतिवृष्टीमुळे नद्यांमधून मोठ्या प्रमाणात वाळू, दगड-गोटे आणि माती वाहून आल्याने तलाव, पाझर तलाव आणि बंधारे निम्म्याहून अधिक भरून गेले आहेत. यामुळे पाणीसाठा कमी होण्याची शक्यता निर्माण झाली असून भविष्यात पाणीटंचाईचा धोका वाढू शकतो. त्यामुळे या जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे अत्यावश्यक असल्याचे धीवर यांनी स्पष्ट केले आहे.

### कुत्रे, गाई-म्हशींसह 'प्रहार'चे जलसंधारण विभागात आंदोलन



**अहिल्यानगर** : एरंडोली (ता. श्रीगोंदा) येथील साठवण तलावाचे काम गेल्या तीन वर्षांपासून रखडल्याच्या निषेधार्थ प्रहार जनशक्ती संघटना व ग्रामस्थांच्या वतीने जलसंधारण विभागाच्या कार्यालयात थेट कुत्रे, गाई व म्हशींसह ठिय्या आंदोलन करत प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी प्रशासनाला धारेवर धरुन साठवण तलावाचे काम त्वरीत सुरु करण्याची मागणी करण्यात आली. अचानकपणे कार्यालयात आलेले कुत्रे आणि जनवारांमुळे अधिकारी व कर्मचारी गडबडले. प्रहार जनशक्तीचे जिल्हा समन्वयक विजय भंडारे व जिल्हाध्यक्ष विनोदसिंग परदेशी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात जिल्हा उपाध्यक्ष पप्पूशेठ जेवले, अविनाश ठाणगे, तालुकाध्यक्ष नानासाहेब पाडते, एरंडोली गावातील सागरभाऊ जठार, भाऊसाहेब बनकर, अण्णासाहेब सोनवणे, नारायणभाऊ भंडारे, राहुल इथापे, राहुल जगताप, सोनवणे, सतीश मोरे, प्रकाश मोरे, राजेंद्र जठार, जयसिंग शेलार, संपत मोरे, विठ्ठल भंडारे, भास्कर भंडारे, संदीप भंडारे, किशोर भंडारे, रणधीर भंडारे, सागर जठार आदींसह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ सहभागी झाले होते.

# इमामपूर-बहिरवाडी-ससेवाडीची तहान भागवण्यासाठी 'टँकर'

## भोयरे पठारचा प्रस्ताव दाखल ; पाणी टंचाईच्या झळा ; जलस्रोत कोरडे ठाक

**तालुका टँकर मुक्त करण्यासाठी नद्यांचे तसेच ओढ्यांचे खोलीकरण करणे. तलावातील गाळ उपसा, तलाव, बंधारे दुरुस्ती करून गळती बंद करणे. वृक्ष लागवड करणे. पाणी आडवा पाणी जिरवा मोहीम मोठ्या प्रमाणात राबवणे. पाण्याचा जपून वापर करणे. अशा विविध योजना गावोगावी प्रभावीपणे राबविल्या गेल्यास तालुका टँकर मुक्त होण्यास निश्चितपणे मदत होणार असल्याचा मतप्रवाह सुज्ञ नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे.**

शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका** : नगर तालुक्यातील बहिरवाडी, ससेवाडी, इमामपूर गावांची तहान भागवण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. डोंगर उतारावरील विविध गावांमधील विहिरी, कुपनलिका कोरडेठाक पडले असून सर्वच जलस्रोत बंद झाले आहेत. त्यामुळे पाणीटंचाईच्या झळा नागरिकांना सोसाव्या लागत आहेत. भोयरे पठार गावचा टँकर साठी प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यातील विविध गावे गर्भगिरीच्या डोंगर उतारावर वसलेली आहेत. अशा गावांनी पावसाच्या सुरुवातीलाच भूजल पातळी वाढते तर उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच भूजल पातळी झपाट्याने खालावत जाऊन पाणीटंचाई जाणवण्यास सुरुवात होत असते.

इमामपूर, बहिरवाडी, ससेवाडी या गावांसह ठराविक गावांना दरवर्षीच उन्हाळ्यात टँकरवर अवलंबून राहावे लागते. इमामपूर बहिरवाडी ससेवाडी या तीन गावांना १० एप्रिल दरम्यान टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. तर भोयरे पठार गावचा पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करण्याचा प्रस्ताव पंचायत समितीकडे दाखल झालेला आहे.

अतिवृष्टी होऊनही काही गावांनी उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या झळा जाणवण्यास सुरुवात झाली आहे. तालुक्यात अतिवृष्टीने धुमाकूळ घातला होता. सर्व नद्या नाल्यांना




महापुराची परिस्थिती निर्माण झाली होती. तालुक्यातील सर्वच तलाव, नाले, बंधारे तुडुंब भरले होते. तरीदेखील पिण्याच्या पाण्यासाठी उन्हाळ्यात टँकर सुरू करावे लागले आहेत. जलसंधारणाचे मोठ्या प्रमाणात कामे झालेले आहेत. अनेक नद्या, ओढ्यांवर बंधारे बांधण्यात आले आहेत.

तालुका टँकर मुक्त करण्यासाठी 'पाणी आडवा पाणी जिरवा' मोहीम गावोगावी सक्रियपणे राबवण्याचे गरज आहे. भौगोलिक संरचनेनुसार डोंगर उतारावर वसलेल्या गावांनी पाणीटंचाईच्या झळा जाणवतात हे वास्तव आहे. अशा गावांनी पशुधनाच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण होतो. जेऊर परिसरातील वाड्यावस्त्यांवर देखील पाणीटंचाईची समस्या जाणवण्यास सुरुवात झाली आहे. येथे देखील लवकरच टँकर सुरू करावे लागतील अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आणखी काही गावांचे टँकर साठी प्रस्ताव दाखल होण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

## सेवानिवृत्तीनंतर आपल्या अनुभवाचा फायदा

# संस्था व समाजाला व्हावा : अ‍ॅड.काकडे




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शहरटाकळी** : आयुष्यभर विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कारांचे धडे देणारे,विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, परिश्रम व शिस्त यांचे महत्त्व सांगत उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरित करणारे शिक्षक जेव्हा सेवानिवृत्त होतात त्यावेळी प्रचंड पोकळी निर्माण होत असते. प्रामाणिकपणे सेवा देणाऱ्यांना त्यांच्या चांगल्या कामाची पावती मिळाल्याशिवाय राहत नाही. तेव्हा निवृत्तीनंतरच्या आयुष्यात आपल्या अनुभवाचा फायदा संस्था व समाजासाठी आपण करावा. असे प्रतिपादन ड.डॉ.विद्याधर काकडे यांनी केले.

कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे शेवगाव तालुक्यातील शहरटकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवार दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी सेवापूर्ती गौरव समारंभ पार पडला.

या समारंभात सेवानिवृत्त प्राचार्य कांतेश्वर ढोले, क्रीडाशिक्षक हरिश्चंद्र मडके व वरिष्ठ लिपिक राजेंद्र हुशार यांचा संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सपत्नीक सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.डॉ.लक्ष्मणराव बिटाळ होते.

संस्थेने केलेल्या सन्मानाला उत्तर देताना प्राचार्य ढोले, हरिश्चंद्र मडके तसेच राजेंद्र हुशार यांनी संस्थेच्या ध्येय धोरणाबद्दल सकारात्मक विचार मांडताना संस्थाहिताबद्दल आवश्यक त्या गोष्टी करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. असे सांगितले.

यावेळी रामायणाचार्य हभप वैभव महाराज माळवदे, माजी लाचलुचपत अधिकारी ज्ञानदेव गवारे, ,अ‍ॅड.अनिलराव मड्के भाऊसाहेब मडके यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला हभप रामायणाचार्य वैभव म.माळवदे, अ‍ॅड.अनिलराव मड्के, संस्था शिक्षणविभाग सहप्रमुख अशोक आहेर,भाऊसाहेब मडके, अप्पासाहेब फटांगडे, काकासाहेब घुले, उत्तमराव निकाळजे, बाळासाहेब खराडे, रोहित काथवटे , राजुभाऊ खंडागळे, संपतराव दसपुते, रामचंद्र गिरम , दिंगबर पवार, पालक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी, आप्तेष्ट, नातेवाईक व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य सुनिल जायभाये यांनी केले.सूत्रसंचालन दीपक बोडखे व आभार प्रदर्शन विद्यालयातील सहशिक्षक शशिकांत काकडे यांनी केले.

## निरंकारी मिशनच्या वतीने आयोजित

# शिबिरात १७५ जणांनी केले रक्तदान

**अहिल्यानगर** : मानव एकता दिवस' २४ एप्रिल रोजी युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंहजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिताजी यांच्या सान्निध्यात, दिल्लीतील ग्राउंड येथे अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. याचबरोबर देशभरातील हजारो सत्संग केंद्रांवरही हा दिवस श्रद्धा व समर्पणभावाने यशस्वीरीत्या पार पडला.

संत निरंकारी मंडळाचे सचिव आ.श्री जोगिंदर सुखीजा यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज देशभरातील सुमारे २००हून अधिक ठिकाणी रक्तदान शिबिरांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या माध्यमातून जवळपास ४०,००० युनिट रक्त संकलित करण्यात आले.

मानव एकता दिवसानिमित्त अहिल्यानगर येथे आयोजित रक्तदान शिबिराचे उदघाटन डॉ. प्रफुल्ल चौधरी व डॉ. कैलास झालानी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले, यावेळी झोनल इन्चार्ज हरीश खुबचंदानी, आनंद कृष्णानी, विठ्ठल खाडे व सेवादल सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते, शिबिरात जिल्हा रुग्णालय रक्तपेढी तील अनुभवी डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदात्यांची आवश्यक



आरोग्य तपासणी केली. या उपक्रमातून १७५ इतक्या रक्तयुनिटचे संकलन करण्यात आले. रक्तदान करणाऱ्यांमध्ये महिलांची संख्या ही लक्षणीय होती. अनेकांनी पहिल्यांदाच रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपत मानवसेवेचे कर्तव्य पार पाडले. यावेळी स्वच्छता, सतर्कता व सेवाभाव यांना विशेष प्राधान्य देण्यात आले.

युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंह जी यांनी सत्य, साधेपणा आणि सद्भावनेचा मार्ग दाखवत तरुणांना नशामुक्त जीवनाचा अवलंब करण्याचे आणि आपली ऊर्जा समाजसेवेसाठी वापरण्याचे आवाहन केले. बाबा हरदेव सिंह जी यांनी रक्त नाड्यांतून वाहावे, नाल्यांतून नव्हे हा संदेश देत सेवेला जीवनाचा अविभाज्य घटक बनवले. हाच सेवा-संदेश सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आजही प्रभावीपणे पुढे नेला जात आहे.

# अवैध गौण खनिज प्रकरणात तलाठ्यावर गंभीर आरोप; कारवाई न झाल्यास उपोषण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : पारनेर तहसिल कार्यालयाअंतर्गत मौजे ढवळपुरी येथील कामगार तलाठी यांनी अवैध गौण खनिज वाहतूक करणारे वाहन सोडवून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविल्याचा गंभीर आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आला आहे. संबंधित तलाठीवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी नाशिक विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी २१ दिवसांच्या आत दोषींवर कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, पारनेर तहसिल अंतर्गत ढवळपुरी गावठाणाजवळील के.के. रेंज परिसर हा आर्मी प्रशासनाकडे हस्तांतरित करण्यात आलेला असून, या विस्तृत भागात नद्या, ओढे आणि नाले असल्याने माती, मुरूम व वाळूचे साठे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. परिणामी, या भागात गौण खनिजांची अवैध वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, महसूल विभागाकडून या अवैध प्रकारांवर नियमित कारवाई होत नसल्याचा आरोप असून, आर्मी गस्त पथकाने वाहन पकडल्यानंतरच महसूल व पोलीस विभागाला बोलावून पंचनामा केला जातो. मात्र, त्यानंतरही संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रभावी कारवाई होत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.



दि. २० एप्रिल रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास के.के. रेंज हद्दीत ढवळपुरी-जांभळी रस्त्यावर गट क्रमांक ८५४ मध्ये अवैध गौण खनिज उत्खननाचे वाहन पकडण्यात आले. यावेळी कामगार तलाठी व कोतवाल घटनास्थळी पोहोचले होते. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४८(७) व ४८(८) नुसार अशा वाहनांची जप्ती करून पुढील कारवाई करणे अपेक्षित असताना, नियमांची पायमल्ली करून संबंधित वाहनधारकाकडून सुमारे २ लाख रुपये घेऊन वाहन सोडून दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

तसेच, संबंधित शेतमालक यांनीही कोणतीही वैध परवानगी न घेता गौण खनिज उत्खनन केल्याने शासनाचा महसूल बुडविल्याचे नमूद करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणात तलाठी यांनी आर्थिक तडजोड करून अवैध धंद्यांना पाठबळ दिल्याचा आरोप समितीने केला असून, हा प्रकार पदाचा गैरवापर व कर्तव्यात कसूर असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर कठोर शिस्तभंगाची कारवाई करून सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# श्रीगोंदा शहरानजीक अपघात

## कामावर निघालेल्या पतीचा मृत्यू तर पत्नी गंभीर जखमी!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : रस्त्यावर एका अज्ञात वाहनाच्या बेफाम आडव्या वळणाने एका कुटुंबाचा संसार अक्षरशः उद्ध्वस्त केला. श्रीगोंदाकाष्टी मार्गावरील हॉटेल अनन्या परिसरात आज सकाळी साडे अकराच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वार पतीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून पत्नी गंभीर जखमी आहे.

हरिश्चंद्र एकनाथराव पवार (वय ४८, रा. करंजकल्ला, ता. कळम, जि. धाराशिव) असे मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पवार दाम्पत्य हे आपल्या गावावरून रांजणगाव गणपती येथे कंपनीत कामासाठी दुचाकीवरून निघाले होते. श्रीगोंदाकाष्टी रस्त्यावर हॉटेल अनन्या जवळ आले असता एका अज्ञात वाहनाने अचानक आडवे वळण घेतले. या धक्कादायक हालचालीमुळे पवार यांच्या दुचाकीची समोरून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीशी जोरदार धडक झाली.

या अपघातात पवार दाम्पत्य गंभीर जखमी झाले, तर समोरच्या दुचाकीवरील ट्रिपल सीट प्रवास करणारे श्रीगोंद्यातील तरुण किरकोळ जखमी झाले. अपघातानंतर हॉटेल अनन्याचे मालक महेश शेंडगे व स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत जखमींना मदत केलीअपघाताच्या गोंधळातही माणुसकीची ही बाजू ठामपणे उभी राहिली.

दरम्यान, पोलिसांना माहिती मिळताच श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पो.हे.कॉ. आप्पा तरटे यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तात्काळ खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना हरिश्चंद्र पवार यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पत्नीवर सध्या उपचार सुरू असून प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

मृतदेहाचा पंचनामा करून तो नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला असून अज्ञात वाहनाचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. पुढील तपास पो. हे.कॉ. आप्पा तरटे करीत आहेत.

एक क्षणाचा बेफिकीर वळण आणि आयुष्याचा मार्ग कायमचा बदलून गेलारस्ते सुरक्षिततेच्या घोषणांपलीकडे प्रत्यक्ष शिस्त कधी येणार, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# जनसहभागातून हिवतापमुक्त समाजाकडे वाटचाल

**अहिल्यानगर** : दरवर्षी २५ एप्रिल हा दिवस जागतिक हिवताप दिन म्हणून साजरा केला जातो. हिवताप (मलेरिया) हा डासांद्वारे पसरणारा गंभीर संसर्गजन्य रोग असून त्याच्या प्रतिबंधासाठी जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर यंदाचा जागतिक हिवताप दिन विविध जनजागृती उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावर्षी हिवताप दूरीकरणासाठी कटिबद्ध, आता हे शक्य आहे... आता हे केलेच पाहिजे! या घोषवाक्याखाली




हिवताप विभाग अहिल्यानगर शहर व अहिल्यानगर महानगरपालिका, आरोग्य विभाग यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून शहरातील नागरिकांमध्ये डास नियंत्रण व हिवताप प्रतिबंधाबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे.

नागरिकांनी आपल्या परिसरात पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी झाकून ठेवणे, आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळणे, मच्छरदाणीचा वापर करणे तसेच ताप आल्यास त्वरित रक्त तपासणी करून घेणे, असे महत्त्वपूर्ण आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हिवताप विभागाचे आरोग्य निरीक्षक पुरुषोत्तम आडेप, सिव्हिल नागरी आरोग्य केंद्रातील एलएचव्ही श्रीमती बांगर, आरोग्य सेविका मीना गुंड, सर्व आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका तसेच हिवताप विभागाचे आरोग्य कर्मचारी मनीष ईश्वरे, प्रशांत चव्हाण, अमोल दहातोंडे, विशाल शिंदे आणि दत्ता सातपुते यांनी विशेष प्रयत्न केले.

# 'शरीर निरोगी'साठी नियमित व्यायाम गरजेचे : मनपा आयुक्त यशवंत डांगे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचा उत्साहात समारोप झाला. विजेत्या कर्मचाऱ्यांना पारितोषिक वितरण करून त्यांचा सन्मान करण्यात आला. या स्पर्धांमध्ये मनपा प्रभाग समिती क्रमांक दोनने उत्कृष्ट कामगिरी करत जनरल चॅम्पियनशिपचा मान पटकावला.

या प्रसंगी आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी मनपा



क्रीडा अधिकारी फिलिप्स तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, प्रत्येकाने आयुष्यात खेळ आणि कला जोपासली पाहिजे. दैनंदिन कामकाजामध्ये येणारा ताणतणाव कमी करण्यासाठी क्रीडा स्पर्धाअत्यंत उपयुक्त ठरतात. शरीर हीच आपली खरी धनसंपत्ती असून ते निरोगी ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले, महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या पाहिजेत. नागरिकांच्या समस्या शांतपणे ऐकून त्यांचे निराकरण करणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे.

प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आरोग्यही चांगले राहते. कामाबरोबरच क्रीडा व इतर उपक्रमांमध्ये सहभाग घेतल्यास जीवन अधिक आनंदी आणि निरोगी होते. भविष्यात क्रीडा स्पर्धांचे अधिक मोठ्या स्वरूपात आयोजन करण्यात येईल, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मनपा क्रीडा अधिकारी फिलिप्स यांनी स्पर्धांचा आढावा घेतला.

जनरल चॅम्पियनशिप: प्रभाग समिती क्रमांक दोन क्रिकेट स्पर्धा विजेता: घनकचरा विभाग उपविजेता: प्रभाग समिती क्रमांक तीन (झेंडी गेट) बुद्धिबळ स्पर्धा विजेते: शहर अभियंता मनोज पारखे व संकेत आढाव, उत्कृष्ट गोलंदाज: सागर वैरागर, उत्कृष्ट फलंदाज: सतीश वाघमारे याशिवाय विविध क्रीडा प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

रविवार, दि.२६ एप्रिल २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

# चारीच्या वादातून मायलेकास मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील संक्रापुर येथे शेतीतील पाण्याच्या चारीच्या वादातून शेजार्यांकडून मायलेकास मारहाण झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मंदा जालिंदर चव्हाण (वय ५० वर्षे, रा. संक्रापुर, ता. राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, त्यांच्या शेतातून इरिगेशनची पाण्याची चारी जात असून त्यावरून शेजारी दादासाहेब वेणुनाथ चव्हाण व त्यांच्या कुटुंबीयांशी वाद सुरू होता. दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास मंदा चव्हाण व त्यांचे पती शेतात काम करत असताना आरोपी दादासाहेब वेणुनाथ चव्हाण, कमा दादासाहेब चव्हाण, करण दादासाहेब चव्हाण, संजय वेनुनाथ चव्हाण, सुनिता संजय चव्हाण व प्रसाद संजय चव्हाण (सर्व रा. संक्रापुर, ता. राहुरी) हे शेतातील पाण्याची चारी बुजवत होते. यास विरोध केल्याने वाद वाढला. यावेळी आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ व दमदाटी करत हाताने व लोखंडी पाईपने मारहाण केली. तसेच गळ्यातील सुमारे एक तोळ्याची सोन्याची पोत तोडून नेल्याचा आरोप आहे. दरम्यान, फिर्यादीचा मुलगा अमोल हा मध्यस्थी करण्यासाठी आला असता, त्यालाही प्रसाद चव्हाण याने खाली पाडून लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. घटनेनंतर आरोपींनी जीवे मारण्याची धमकी देत तेथून पळ काढला. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात ६ जणांवर गुन्हा रजि. नं. ३९५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ११८ (१), ११९ (१) , १८९ (२), १९०, १९१ (२), ३५१ (२), ३५२ अन्वये दाखल करण्यात आला असून पुढील तपास राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

# राष्ट्र सहयाद्रीच्या गुरुमाता विशेष पुरवणीचे गुरुवर्य भास्करगिरी बाबांच्या हस्ते प्रकाशन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील भू लोकीचा स्वर्ग अशी ओळख असलेल्या देवगड गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख राष्ट्र संत महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या मातोश्री गं.भा. सरूबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील यांच्या चौदाव्या निमित्ताने दैनिक राष्ट्र सहयाद्रीने काढलेल्या विशेष पुरवणीचे प्रकाशन गुरुवर्य भास्करगिरी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दैनिक राष्ट्र सहयाद्रीचे संपादक करणजी नवले, कार्यकारी संपादिका पूनमताई नवले यांच्या हस्ते विशेष पुरवणीचा अंक भगवान दत्तात्रय, श्री समर्थ किसनगिरी बाबा यांना अर्पण करण्यात आला त्यानंतर गुरूमाता सरूआई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन सदरची प्रत त्यांच्या स्मृतीस अर्पण करण्यात आली.



प्रसन्नतेचा पारिजात गुरुमाता सरुआई यांच्या जीवन कार्याचा परिचय पुरवणीत असल्याने उपस्थित भाविकांना दैनिक राष्ट्र सहयाद्रीचे अंक मोफत वाटप करण्यात आले.यावेळी भाविक सरूआईच्या जीवनावरील लेखांचे वाचन करतांना परिसरात दिसत होते. आकर्षक काढण्यात आलेल्या पुरवणीचे वाचन गुरुवर्य भास्करगिरी बाबा व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांनी केले.

यावेळी झालेल्या पुरवणी प्रकाशन प्रसंगी राष्ट्र सह्याद्रीचे तालुका प्रतिनिधी सुधीर चव्हाण, नेवासा बुद्रुक प्रतिनिधी संभाजी ठाणगे, पत्रकार बाळासाहेब पंडित, संतसेवक अजय साबळे, संदीप साबळे, संतोष रायपुरे, ईश्वर महाराज मते, बाळू महाराज कानडे, तात्या महाराज शिंदे, शुभम महाराज बनकर, रामेश्वर तनपुरे, बदाम महाराज पठाडे, श्रीधर शिरकुले,बंटी पठाडे, राष्ट्र सहयाद्री कार्यालयाचे सरताज सय्यद यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**(छायाचित्रे- संदीप साबळे देवगड)**

# विकासाचा 'करंट' थेट निघोजच्या ढवण-वराळ वस्तीत!

## सुजित झावरे-पाटलांच्या 'पॉवरफुल' पाठपुराव्याने वर्षानुवर्षांचा वीजप्रश्न निकाली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : निघोज येथील ढवण आणि वराळ वस्तीवर गेल्या अनेक वर्षांपासून भेडसावणारा विजेचा गंभीर प्रश्न अखेर सुटला आहे. जिल्हा परिषदेचे माजी उप अध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे-पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून या वस्तीवर नवीन रोहित्र (उझ) बसवण्यात आले. या कामामुळे वस्तीवरील अंधार कायमचा दूर झाला आहे. या जलद गतीने केलेल्या कार्यवाहीबद्दल निघोज ग्रामस्थांच्या वतीने सुजित झावरे-पाटील यांचा विशेष नागरी सत्कार करण्यात आला. या कामासाठी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे सल्लागार तथा ग्रामपंचायत सदस्य मंगेश वराळ, युवा नेतृत्व पै. सुभाष वराळ पाटील, रावसाहेब वराळ आणि पै. विलास वराळ यांनी प्रशासनाकडे सातत्याने विशेष पाठपुरावा केला.






या नवीन रोहित्राच्या लोकार्पण व सत्कार सोहळ्याला परिसरातील माजी सरपंच ठकाराम लंके,शिवसेना महिला आघाडी प्रमुख सौ. कोमल भंडारी, उपतालुकाप्रमुख देवराम लामखडे, शेतकरी सेना तालुकाप्रमुख महेंद्र पांढरकर, शहाजी कवडे, पै. लहू निचित, हर्षद इधाटे, स्वप्निल आतकर यांच्यासह वस्तीवरील रमेश अण्णा ढवळे, राजू भिकाजी ढवळे, गौतम गणपत ढवळे, महेश भाऊ ढवळे, श्रीराम दत्तात्रय ढवळे, भास्कर दत्तात्रय ढवळे, नवनाथ शांताराम ढवळे, सतीश नामदेव ढवळे, बबन रामचंद्र ढवळे, रघुनाथ रामचंद्र ढवळे, सदाशिव कोंडीबा ढवळे, सागर ज्ञानदेव ढवळे, सुनील प्रकाश ढवळे, आदित्य सतीश ढवळे, तुषार रघुनाथ ढवळे, सिद्धार्थ सदाशिव ढवळे, समीर बबन ढवळे, सुखदेव रामचंद्र ढवळे, रमेश सुखदेव ढवळे, वैभव रामदास भोसले, अतुल रामदास भोसले, किसन नामदेव थोरात, साहिल गौतम ढवळे, नितीन भिकाजी ढवळे, चंद्रकांत बाळू ढवळे, वत्सला शिवाजी ढवळे, अनिता प्रकाश ढवळे, बबीता बबन ढवळे, तन्मय संदीप ढवळे, कार्तिक नितीन ढवळे, सागर शिवाजी ढवळे यासह सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा उद्यापासून बेमुदत बंदचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्यांवर कृषी विभागाकडून ठोस निर्णय होत नसल्याच्या निषेधार्थ, राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी उद्या सोमवार दि. २७ एप्रिलपासून बेमुदत विक्री केंद्रे बंद ठेवण्याचा इशारा दिला आहे. या राज्यव्यापी आंदोलनात अहिल्यानगर जिल्हा कृषी निविष्ठा विक्रेता असोसिएशनने सक्रीय सहभाग जाहीर केला आहे.

कृषी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हंटले आहे की, बियाणे, रासायनिक खते आवणि किटकनाशके विक्री व्यवसायातील विविध अडचणींबाबत गेल्या चार ते पाच वर्षांपासून राज्याचे कृषीमंत्री, प्रधान सचिव (कृषी), कृषी आयुक्त तसेच निविष्ठा व गुणनियंत्रण विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे विक्रेत्यांनी निवेदनात नमूद केले आहे. मात्र, याबाबत अद्याप ठोस निर्णय न झाल्याने विक्रेत्यांमध्ये नाराजी वाढत आहे. कंपन्यांकडून रासायनिक खतांच्या पुरवठ्यात होणारे लिंकींग बंद करणे, शेजारील राज्यांतून येणाऱ्या अप्रमाणित एचटीबीटी कपाशी बियाण्यांवर बंदी, साथी पोर्टलचा वापर उत्पादक व पुरवठादार स्तरावरच राबविणे, रासायनिक खतांचा पुरवठा एफओआर पद्धतीने करणे, विक्री मार्जिनमध्ये वाढ करणे, सीलबंद पॅकिंगमधील बियाण्यांचे नमुने अपयशी ठरल्यास विक्रेत्यांना आरोपी न ठरविता साक्षीदार म्हणून मान्यता देणे, गुणवत्ता तपासणीतील प्रलंबित रकमा विक्रेत्यांना मिळणे, विक्री केंद्र तपासणीसाठी अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबतचा आदेश रद्द करणे, खरीप हंगाम २०२६ साठी युरिया व डीएपी खत वितरणाच्या कार्यपद्धतीचा फेरविचार करणे, मुदतबाह्य किटकनाशके कंपन्यांनी परत घेणे यांसारख्या मागण्याही करण्यात आल्या आहेत.

या सर्व मागण्यांवर पुढील आठ दिवसांत सकारात्मक निर्णय न झाल्यास उद्या २७ एप्रिलपासून अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्री केंद्रे बेमुदत बंद ठेवण्यात येतील, असा इशारा जिल्हा असोसिएशनने दिला आहे. या निवेदनावर अध्यक्ष राहुल उंडे, उपाध्यक्ष बाळासाहेब हुरूळे, सचिव संजय कासलीवाल, चेतन औताडे, चंद्रकांत डावखर, रणजित धुमाळ, किरण सोनवणे, अशोक औताडे, संदीप मते, अमित शिवरकर, नितीन औताडे आदींची नावे आहेत.

# जनगणना मोहीमेसाठी २१५ प्रगणकांची, पर्यवेक्षकांची नियुक्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : देशाच्या भविष्यातील विकासाचा पाया ठरणारी जनगणना मोहीम आता वेग घेत आहे. श्रीरामपूर शहर आणि तालुक्यातील जनगणनेसाठी प्रशासनाने कंबर कसली असून २१५ प्रगणकांची, पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, यंदाची हो पारंपरिक कागद-पेन्शन ऐवजी पूर्णपणे 'डिजिटल' पद्धतीने होणार असल्याने माहिती अधिक अचूक आणि वेगवान मिळणार आहे. या मोहिमेचे प्रशिक्षण २५ एप्रिल ते ४ मे या कालावधीत पाच टप्प्यांत पार पडणार असल्याची माहिती प्रांताधिकारी किरण सावंत आणि चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी दिली. शहरातील १७ वॉर्ड क्षेत्रांची जबाबदारी या प्रगणकांवर असेल. प्रत्येक घरापर्यंत पोहचून हे प्रगणक माहिती संकलित करणार आहेत.




शहरासाठी भि. रा. खटोड कन्या विद्यालय ही दोन केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. नागरिकांना यंदा एक विशेष सुविधा देण्यात आली आहे. १ मे ते १५ मे या काळात नागरिक स्वगणना करू शकतात. यासाठी ऑनलाइन पोर्टलवर जाऊन स्वतःची माहिती स्वतः भरता येईल, ज्यामुळे प्रगणकांचा वेळ वाचेल आणि कामात सुसूत्रता येईल, जनगणने दरम्यान दिली जाणारी माहिती पूर्णपणे सुरक्षित आणि गोपनीय ठेवली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रगणक जेव्हा आपल्या घरी येतील, तेव्हा त्यांच्याकडे अधिकृत ओळखपत्र असेल. नागरिकांनी घाबरून न जाता अचूक माहिती देऊन या राष्ट्रीय कार्यात सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासकीय पथकाने केले आहे.

प्रांत अधिकारी किरण सावंत, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, उपमुख्यअधिकारी तथा सहाय्यक जनगणना अधिकारी महिंद्र तापकिरे यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञांची टीम यावर काम करत आहे. यात सुनील गोसावी, अपूर्व निकम, सुचिता शिंदे, दत्तात्रय कांबळे, या 'मास्टर ट्रेनर्स'चा समावेश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर त्रिभुवन, यांनी केले, पुरण धांडे, रुपेश गुजर, मनोज परदेशी, मिलिंद देवकर, आशिष शिरोळे, प्रमोद माने, अमोल साळुंखे, टेक्निकल असिस्टंट मयूर कोल्हे , रामचंद्र माळवे, गोरख पवार, राजेंद्र शेळके, राम कृष्ण अहिरे, डॅनियल शेळके, अधिक कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

पहिल्या टप्प्यासाठी ९० प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात आली होती. त्यापैकी ८६ कर्मचारी प्रशिक्षणासाठी उपस्थित राहिले, तर अनुपस्थित राहिलेल्या चार कर्मचाऱ्यांना चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

# 'एआय' चे केंद्र बनण्याची अहिल्यानगरची क्षमता : आ. संग्राम जगताप

## नगरमधील 'ग्रामीण एआय समिट २०२६' ला मोठा प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर** : आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात एआय आज परवलीचा शब्द बनला आहे. जीवनातील प्रत्येक क्षेत्र एआयने व्यापले जात आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करून आपण मोठी क्रांती घडवू शकतो. विशेषतः भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेती करताना एआयचा वापर केल्यास मोठे बदल घडू शकतात. अहिल्यानगर जिल्ह्यातील युवा वर्गाला एआयच्या माध्यमातून शेती विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले तर ग्रामीण भागात सुबत्ता वाढण्यास मदत होईल. मेट्रो सिटीमध्ये सेंद्रिय कृषी उत्पादनांना मोठी मागणी असते. एआय तंत्रज्ञान सेंद्रिय शेतीसाठी मदत करणारे ठरू शकते. त्यामुळे शेती करून चांगले उत्पन्न मिळू शकते.

युवा वर्गासाठी एआय तंत्रज्ञान मोठी संधी आहे. अहिल्यानगर मध्ये होत असलेल्या ग्रामीण एआय समिट मुळे युवा वर्गाला भविष्यातील दिशा मिळेल असा विश्वास आ. संग्राम जगताप यांनी व्यक्त केला. नितीन उदमले फाउंडेशनच्या वतीने आयोजित ग्रामीण एआय समिट २०२६ चे उद्घाटन माउली सभागृहात आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, कृषी विपणन संचालक शरद जरे, द डेटा टेक लॅब्सचे संस्थापक डॉ. अमित आंद्रे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, प्रा. भानुदास बेरड व अभय आगरकर उपस्थित होते. तसेच समिट मधील वक्ते रवींद्र पाल सिंग, डॉ. स्मिता काळे, अमित सिंग, डॉ. रिधिमा दुवा, दादासाहेब भगत, डॉ. निरंजन देशमुख, सुखदेव जमदाडे व मकरंद जोशी आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात आयोजक नितीन उदमले यांनी एआय भारताचे भविष्य घडवत आहे.



अहिल्यानगर जिल्ह्याची एआय व स्टार्टअप क्षेत्रात देशाच्या नकाशावर ठळकपणे उदयास येण्याची क्षमता आहे. असे सांगितले. पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले, एलन मस्क यांनी काही वर्षांपूर्वी सांगितले की, भविष्यात जवळपास सर्वच कामं एआय तंत्रज्ञान करणार असून मनुष्याला फक्त आवडेल ते काम करता येईल. इतक मोठा बदल भविष्यात होऊ शकतो. या समिट मध्ये ग्रामीण एआय: डिजिटल समावेशनातून बुद्धिमान सक्षमीकरणाकडे, एआयचा नैतिक वापर, डेटा सुरक्षा आणि जबाबदार तंत्रज्ञान, औद्योगिक क्रांतीतील एआय आणि संधी, एआयच्या माध्यमातून नवीन व्यवसाय संधी फिल्म मेकिंग, जाहिरात आणि सोशल मीडिया मार्केटिंगमध्ये एआय, आरोग्य क्षेत्रातील एआयचा वापर, एआयच्या वापरातून फायदेशीर स्टार्टअप्स व ग्रामीण रोजगार, एआय आणि कृषि अशा विविध विषयांवर तज्ज्ञांनी प्रभावी मार्गदर्शन केले.

समिटला जिल्ह्यातील युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या समिटसाठी विठ्ठल लांडगे, हर्षल आगळे, संजय आडोळे, विनित जामगावकर आदींनी परिश्रम घेतले.

# अकोल्यातील तरुण कामगाराचा संगमनेर जवळ अपघातात जागीच मृत्यू

## महामार्गावरील एकेरी वाहतूक ठरतेय जीवघेणी; ट्रकचालकावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : संगमनेर औद्योगिक वसाहतीजवळ नाशिक-पुणे महामार्गावर गुरुवारी रात्री मालवाहू ट्रक आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला. या अपघातात अकोले तालुक्यातील डोंगरगाव येथील २८ वर्षीय तरुण दिगंबर (बापू) रामदास उगले यांचा जागीच मृत्यू झाला. महामार्गाच्या अर्धवट कामामुळे सुरू असलेल्या एकेरी वाहतुकीने या तरुणाचा बळी घेतल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत दिगंबर उगले हे संगमनेर येथील टाटा मोटर्समध्ये कार्यरत होते. गुरुवारी (दि. २३) सायंकाळी ७:४५ च्या सुमारास काम संपवून ते आपल्या दुचाकीने (क्र. एमएच १५ एआर ५२४०) घरी जात होते.



यावेळी नाशिकच्या दिशेकडून येणाऱ्या अशोक लेलंड ट्रकने (क्र. एमएच १७ सीव्ही ५१३१) त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दिगंबर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन ते जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडले. अपघाताचा आवाज होताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि संगमनेर शहर पोलिसांना माहिती दिली. जखमी दिगंबर यांना तातडीने घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले.

पोलिसांनी रात्री उशिरा घटनास्थळाचा पंचनामा करून ट्रकचालक व मालकावर गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. संगमनेर शहरानजीक औद्योगिक वसाहतीजवळ महामार्गाचे काम सुरू असल्याने सध्या एकेरी वाहतूक सुरू आहे.

अरुंद रस्ता आणि जड वाहनांची वर्दळ यामुळे या ठिकाणी अपघातांचे सत्र सुरूच आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आणखी किती निष्पाप जीवांचा बळी जाणार, असा सवाल स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला असून याठिकाणी तातडीने सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# ...ती जागा शिवाजी महाराज पुतळ्यासाठी आरक्षीत करा, मागणी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : राहाता येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सद्या गार्डन असलेल्या जागेत पुर्वी डि.पी प्लॅन मध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे शिवाजी स्टॅच्यू आरक्षण होते. नंतरचे काळात छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे आरक्षण हलविण्यात आलेचे दिसुन येते. खरी परिस्थीती पाहता महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले शिवाजी महाराजांचा अश्वरुढ पुतळा छत्रपती शिवाजी महाराज चौकात असावा अशी प्रत्येक शहरवासियांची व शिव भक्तांची प्रबळ इच्छा अनेक वर्षापासुन आहे. परंतु सरकारी लाल फितीतुन व चुकीच्या राजकारणामुळे अद्यापही त्या ठिकाणी पुतळा बसविण्यात आलेला नाही या उलट गेल्या काही दिवसापासुन त्या ठिकाणी खाऊ गल्ली उभारण्याचे नगरपालिकेच्या विचाराधीन असल्याचे समजते. खरे तर नगरपरिषदेने स्वतः पुढाकार घेवुन नवीन प्रस्तावित शहर विकास आराखड्यामध्ये सदर जागेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याचे आरक्षण ठेवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. असे असतांना लोक भावना पायदळी तुडवुन सदर ठिकाणी अडचणीचे ठरणारे वाहतुकीस अडथळा होवुन अपघात केंद्र होण्याच्या ठिकाणी खाऊ गल्ली निर्माण करण्याचा प्रयत्न दिसत आहे. सदर खाऊ गल्लीचे काम थांबवुन कर्तव्य भावनेतुन नवीन डी.पी प्लॅन मध्ये सदर जागा छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासाठी आरक्षीत करावे अशी मागणी राहाता नगर परिषद चे नगरसेवक शशीकांत लोळगे यांनी केली आहे.

# ममदापूरच्या कत्तलखान्यावर छापा; ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : राहाता तालुक्यातील ममदापूर गावात लोणी पोलीस पथकाने एका कत्तलखान्यावर धाड टाकून ८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. लोणी पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संजय विखे यांच्या नेतृत्वाखालील पोलीस पथकाने ममदापूर गावातील कत्तलखान्यावर छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी एक इनोव्हा कार, एक मारुती इको कार आणि सुमारे १००० किलो गोमांस जप्त केले आहे. या जप्त केलेल्या मालाची एकूण किंमत ८ लाख रुपये असून, अयान जब्बार कुरेशी (रा. ममदापूर) या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही लोणी पोलिसांनी अनेकदा याच ठिकाणी छापे टाकून मुद्देमाल आणि आरोपींना ताब्यात घेतले आहे. मात्र, तरीही हा कत्तलखाना पुन्हा पुन्हा सुरू होत असल्याने परिसरात गोवंश हत्या थांबण्याचे नाव घेत नाहीये. एकीकडे गोवंश हत्या बंदी झाल्यापासून शेतकऱ्यांची मोठी अडचण झाली आहे. नर जातीच्या गोवंशाचे पालन करणे परवडत नाही आणि दुसरीकडे त्यांची कायदेशीर विक्रीही होत नाही. त्यामुळे या जनावरांचे करायचे काय ? असा गंभीर प्रश्न पशुपालकांसमोर उभा ठाकला आहे. या समस्येमुळे काही शेतकरी वैतागून नर गोवंशाना ओढे, नाले, कालवे किंवा इतरांच्या उसाच्या शेताजवळ सोडून देत आहेत.